# भक्तिप्रदीप



म्हणौनि थोरपण पऱ्हां सांडिजे। एथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे ।
जैं जगा धाकुटें होईजे । तैं जवळीक माझी ।।

# भक्तिप्रदीप

(प.पू.श्री. दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने)

❖

संकलन

**श्री प्रसाद पाटणकर, पुणे**

❖

संपादन

**डॉ. सौ. माधुरी पणशीकर, मुंबई**

❖

प्रकाशक

**श्री भगवती प्रकाशन, पुणे.**

**सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन**

✿

**प्रकाशक :**
श्री भगवती प्रकाशन
६/बी -१ साई विहार फेज दोन
कर्वेनगर, पुणे ४११०५२.
फोन : ५४६९०६०

✿

प्रथम स्मृतिदिन संस्करण
**पू. सौ. आईसाहेब कवीश्वर**
पौष वद्य अष्टमी शके १९२१
दि. २८ जानेवारी २०००

**प. पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर**
फाल्गुन शुद्ध चतुर्दशी, शके १९२१
दि. १८ मार्च २०००

✿

**मुद्रक व टाइपसेटिंग :**
के. जोशी ॲण्ड को.
ब्लॉक मेकर्स ॲण्ड ऑफसेट प्रिंटर्स
१७४५/२, सदाशिव पेठ, पुणे ३०
फोन : ४४७१४०९, ४४८२७४८

✿

**मूल्य रु. २५**

# प्रस्तावना

**॥ श्री गणेशदत्त गुरुभ्योनमः ॥**

**चुकलीया माय बाळ की रडती ।**
**झाले मजप्रती तैसे आता ॥**
**चक्रवाक पक्षी वियोगे बाहाती ।**
**झाले मजप्रती तैसे आता ॥**

भक्त शिरोमणी श्री नामदेव महाराजांनी ईश्वराचा वियोग असह्य होऊन व्याकुळ अंतःकरणानी वरील उद्‌गार काढले. प. पू. महाराजांच्या आठवणींनी आज मन त्यांच्यासारखंच कासाविस झालं आहे. वाळवंटात फिरणाऱ्या तृषार्त जीवासारखी त्याची काहिली झाली आहे..... तथापि प. पू. महाराजांची प्रवचनं वाचतांना त्यांचे शब्द अस्वस्थ मनावर हळुवार फुंकर घालतात. त्यांचे आश्वासक विचार जगण्यासाठी विधायक दिशा दाखवतात, आणि त्यांच्या भक्तीविचारांनी साधकांना मार्गस्थ करतात. म्हणूनच त्यांच्या प्रथम स्मृतीदिनी आम्ही हे पाच प्रवचनांचं पुस्तक भगवती प्रकाशनातर्फे प्रकाशित करत आहोत. ह्या प्रवचनांमधले विचार अंतर्मुख करणारे, आयुष्याच्या वाटचालीत दिग्दर्शन करणारे आहेत. बहुतेक वेळा तत्त्वज्ञान ते कथा माध्यमातून आपल्या मनावर ठसवतात. रसाळपणे अप्रतिहत पणे वाहणारी सोपी सुबोध भाषा हे प. पू. महाराजांच्या

प्रवचनांचे बलस्थान आहे. ती वाचतांना ते जणू काही आपल्याशी प्रत्यक्ष बोलत आहेत, असा भास अनेक वेळा होतो.

आज संतवाङ्मयाची गरजच काय ? ते कालबाह्य झाले आहे का ? मुख्य म्हणजे आजच्या धकाधकीच्या जीवनात संतांचे शब्द खरोखरीच मार्गदर्शक ठरतात का ? हे आणि अशाच प्रकारचे अनेक प्रश्न माणसं विचारत असतात.पुष्कळांना ह्या संतप्रणीत मार्गात पराकाष्ठेचा आंधळेपणा, भोळसटपणा जाणवतो. आज अनेक शास्त्रीय शोध लागत आहेत. वैज्ञानिक दृष्टीचा प्रभाव, दबदबा समाजमनावर पुष्कळ आहे. तरी सूज्ञपणे विचार करणाऱ्याला हे ही जाणवते की वैज्ञानिक ज्ञानाविकासाच्या ह्या काळात मानसिक सुख-समाधान हरवून गेलं आहे. ज्ञानाज्ञानाच्या अतीत असलेला आनंद प्राप्त करून घ्यायचा असेल तर संतवङ्मयाचं शांतपणे परिशीलन करायला हवं. स्थूलाकडून सूक्ष्माकडे ते साधकाचा प्रवास घडवतं. पण त्यासाठी बुद्धी शुद्ध व्हायला हवी. अशी शुद्ध बुद्धी साधकाला कशी मार्गस्थ करते, ते प. पू. महाराजांनी दाखवलेलं आहे. कर्मक्षय झाला तरच देहसंबंध संपतो आणि मुक्ती मिळते हा उपनिषदातला विचार तर्कशुद्ध पद्धतीने सर्वांना समजेल अशा भाषेत त्यांनी 'अनुग्रह' ह्या प्रवचनात मांडलेला दिसतो.

ही प्रवचनं वाचताना प. पू. महाराज शब्दाशब्दातून भेटत राहतात. उद्धवजींना दिलेलं ज्ञान भागवताच्या एकादश स्कंधात अंतर्भूत आहे. समर्थ रामदासांनी दासबोधात आपल्या अंतःकरणाचं प्रतिबिंब पडलं असल्याच शिष्यांना सांगितलं त्याचप्रमाणे निर्गुणात गेलेल्या प. पू. महाराजांची सगुणमूर्ती म्हणजे त्यांची प्रवचनं आहेत. त्यांचं विचारवैभव आणि हृदय प्रवचनांच्या शब्दांत ओतप्रोत भरलेल दिसतं.

श्री. प्रसाद पाटणकर ह्यांनी ह्या प्रवचनांचा अमूल्य ठेवा सर्व

साधकांसाठी उपलब्ध करून दिला. त्यांच्याकडच्या ध्वनीफिती उलगडण्याचं काम सौ. कुलकर्णी आणि त्यांच्या सुकन्या कु. सुप्रिया कुलकर्णी ह्यांनी मनःपूर्वकतेने केलं. श्रीमती सुशीलाताई मोडक ह्यांनी ती तपासून पुस्तक आकाराला आणण्यात बहुमोल सहकार्य केलं. श्री विद्याधर फडके ह्यांनी ही प्रवचनं बारकाईने वाचून श्रीगुरुचरणांची सेवा केली. ह्या सर्वांचे आभार कोणत्या शब्दात मानावे ?

ही सर्व सेवा प. पू. महाराजांनी स्वीकारावी अशी त्यांच्या चरणी विनम्र प्रार्थना !

**- डॉ. सौ. माधुरी पणशीकर,**

*११, गुडविल बिल्डिंग, मनमाला टँक रोड,*
*माहिम, मुंबई १६*

# शुद्धबुद्धीचे कार्य

**" भवे भवे यथा भक्तिः पादयोःस्तव जायते ।**
**तथा कुरुष्य देवेष नाथंस्वन्नो यतः प्रभो ।**
**नमसंकीर्तनं यस्य सर्व पाप प्राणाशनं ।**
**प्रणामो दुःख शमनः तन्नमामी हरीपदम् ।।"**

'दिगंबरा' महामंत्राचा अठरा लक्ष जप झाला आणि त्याचं दशांश हवन, दत्तयाग करुन या ठिकाणी पार पडलेलं आहे. मंत्रशास्त्राच्या दृष्टीनी, सर्व ऋषीमंडळी, ही मंत्रद्रष्टे म्हणून आहेत, मंत्रकर्ते नाही आहेत. मंत्र पाहाणं, बुध्दीमध्ये त्या मंत्राची स्फूर्ती होणं या दृष्टीने त्याला मंत्रदृष्टा म्हटलेलं आहे, आणि त्याचं अनुसंधान नित्य केल्यामुळे त्या त्या मंत्राची ती ती आणखी अशी प्रसिध्दी आहे. हा महामंत्र सद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वती महाराजांच्या द्वारानी सगळ्यांना मिळालेला आहे. गाणगापूर, नरसोबावाडी, कारंजा अशा सर्व दत्त क्षेत्रातून याचं पठण जप वगैरे चालू आहे. तीन दिवसांमध्ये या ठिकाणी आणि या मंत्राचं हवन झालं. हवनाच्या वेळेलाही अग्नि प्रज्वलित असावा असा नियम आहे.

अग्नीच्या ज्वाला उत्पन्न झाल्यानंतर हवन करायचं असतं. तेही या ठिकाणी पाहायला मिळालं. थंडीचा दिवस, चांगलं अनुकूल वाटत असेल लोकांना! पण त्याकरता कोणी याठिकाणी येत नव्हतं. हवन


करावं श्रध्देनं, भक्तीनं याकरता सर्व मंडळी आलेली आहेत. शास्त्रकार जे आहेत, मोठमोठे ऋषी,यांचं एकदर सांगणं असं आहे. "आदिएकंत्तरसेव्याः वेदान्तोगुरिश्वरः। अपूर्व ज्ञानाप्ते पश्चात् कृतघ्नत्व निवर्तये।" मनुष्य जन्म मिळाल्यानंतर वेदांत, गुरु आणि ईश्वर यांची सेवा व्हावी. जिवंत असेपर्यंत व्हावी. "अध्यात्मविज्ञा विद्यानाम् ।" भगवंतांनी सांगीतलेलेच आहे. ती अध्यात्मविद्या म्हणजेच वेदांत आहे. ती अध्यात्म विद्येचा व्यासंग करणारी मंडळी आज या ठिकाणी सत्कारमूर्ती म्हणून उपस्थित आहेत. अशा प्रकारची मंडळी, याचं चिंतन करणारी, ग्रंथरचना करणारी अशा प्रकारची मंडळी, श्रध्देनं कर्तव्य म्हणून काम करणारी मंडळी भारतामध्ये आहेत आणि यांच्याबद्दल श्रीकृष्णांनीही आणखी उल्लेख केलेला आहे. विभूती अध्यायामध्ये काही विशिष्ठ विभूती आरंभाला सांगून टाकल्या त्यांनी. पण सर्व कालामध्ये, आणखी सर्वही ठिकाणी असणाऱ्या विभूतीचा उल्लेख शेवटच्या श्लोकामध्ये त्यांनी केलेला आहे.

**यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ।। गीता ।। १०.४१।।**

अशा विशिष्ट विभूती त्याठिकाणी असतात. त्यांच्याजवळ श्रध्दा आहे. भक्ती आहे. आणखी त्याचप्रमाणे विरक्तीही आहे. कर्तव्यपरायणता आहे. अशा ज्या विशेष विभूती आहेत, लोकांना मार्गदर्शन होणं ज्यांच्याकडून शक्य आहे, ते माझंच तेज आहे, असं भगवंतांनी सामान्य रुपानी सांगून टाकले, म्हणजे काळाचाही विचार करण्याचे कारण नाही आहे. तर अशा रीतीने अशा चांगल्या विभूतींचा, सत्कारमूर्तींचा सत्कार आणि या संस्थेतर्फे आज झाला, तो आज आम्हाला पहायला मिळाला. ही एक मोठी समाधानाची गोष्ट आहे. तर वेदान्ताचं चिंतन करणं, त्याचप्रमाणे गुरुची सेवा करणं ही ईश्वराची सेवा आहे. हे एवढंच भारतामध्ये सांगून ठेवलेलं आहे. शिष्टाचार

हे एक प्रमाण आहे. श्रुतिकारांनी सांगीतल्याप्रमाणे श्रुति स्मृति प्रमाणं असतील त्याचप्रमाणे आचरण करणारी मंडळी आहेत. त्या शिष्टांचा आचार हा एक मोठा मार्ग आहे. यक्षप्रश्नांमध्ये योग्य पंथ कोणाचा, योग्य मार्ग कोणाचा, म्हणून एक प्रश्न आहे. धर्मराजांनी त्याचं उत्तर दिलं' महाजनो येन गतः स पंथः ।'

तर शिष्टाचार हे प्रमाण आहे. शिष्ट मंडळी जी आहेत ईश्वरसेवा करणारी, ती आली आहेत. गुरुसेवा करणारी, अध्यात्मचिंतन करणारी अशा प्रकारची जी शिष्य मंडळी आहेत, यांचं आचरण पाहून आणखी आपल्याला त्याचप्रमाणे आचरण करता येतं. श्रुति स्मृति वाचतंय कोण? आज इतके ग्रंथ पूर्वजांनी लिहून ठेवले आहेत. पण कोणाला वाचायला सवड आहे? आवड नाही म्हणून सवड नाही. सवड नाही असं सांगतो, पण आवड नाही हे मुख्य. जिज्ञासा ही मुख्य आहे. त्याशिवाय ज्ञान होऊ शकत नाहीये, तर त्या शिष्याचे जे आचरण आहे. त्या आचरणानी आपल्याला हे सर्व पाहायला मिळतं आणि आपण कसं वागावं हे त्यावरुन आपल्याला निसंदिग्धपणे समजून येतं. त्याच्यामध्ये बुध्दीभेद होऊ शकत नाहीये. कारण ज्यांची बुद्धी अशी पूर्ण झालेली आहे, अपूर्णता बुध्दीमध्ये राहिलेली नाही, अशा प्रकारचे जे काही ईश्वररुप झालेले तेही पहिल्यापासून वेदान्त, गुरु ईश्वराची सेवा करतात. ज्ञान झाल्यानंतरही त्यांचं ते चालू राहातं ज्ञानोत्तर भक्ती म्हणा ही त्यांची कायम चालू आहे. आणि त्याभक्तीमुळे, त्या श्रध्देमुळे आणखी सर्वांना आपोआप मार्गदर्शन होतं. तेव्हा त्यांनी जे सांगितलेलं आहे. त्याचप्रमाणे आणखी आचरण करण्याचा प्रयत्न करणं हेच मोठं आहे. आणि समाजवाद, समाजवाद म्हणून सध्या आणखी ज्याचं प्रतिपादन केल जातं तो आपल्या एकंदर भारतीय संस्कृतीमध्ये किती सांगितला आहे ! इष्टकर्म आहे, उक्त कर्म आहे. दत्तकर्म आहे. मोठी मोठी हॉस्पिटलं काढावी, त्याचप्रमाणे बागबगीचा तयार करावा, वापी,



प. पू. सौ. ताईमहाराज चाटुफळे

कूप, तलाव हे तयार करावे. त्यापेक्षा समाजवाद तरी दुसरा काय आहे? कोणाचाही पक्ष जरी कार्य करणारा असला तरी त्याच्यापुढे सर्व समाजाला सुखी करण्याचा प्रयत्न करणं, हेच तत्वं आहे. हा समाजवाद आणखी शास्त्रकारांनी ऋषीमंडळींनी, शिष्यमंडळींनी आपल्या आचरण रूपानी करून दाखविलेला आहे. आणखी ज्ञानेश्वर महाराजांच्यासारखें जे महात्मे आहेत त्यांनी हेच सांगितले आहे. ज्ञानेश्वरीची रचना झाल्यानंतर जे काही त्यांनी ईश्वराजवळ पसायदान मागितलेलं आहे, त्यात एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

**''दुरीतांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।**
**जो जे वांछिल तो ते लाहो । प्रणिजात''**

दुरीत संपलं पाहिजे. दुरित संपल्याशिवाय 'जो जे वांछिल तो ते लाहो' हे मिळणार नाहीये. एक व्यक्ति असो किंवा व्यक्तिसमूह असो, त्या समूहानी जरी इच्छा केली तरीसुध्दा आपल्याला हवं तसं घडून येत नाहीये. दुरित गेल्याशिवाय ते घडणार नाही. व्यक्तिशः दुरित आहे. सामुहिक दुरित किती आहे आपल्यामध्ये, समाजामध्ये सर्व विश्वामध्ये ! हे सगळं दुरिति संपल्याशिवाय आणि स्वधर्माकडे लक्षं गेल्याशिवाय, स्वधर्माबद्दल प्रेम निर्माण झाल्याशिवाय हे होणं शक्य नाही. म्हणून एक सिद्धांत म्हणून ईश्वराजवळ हे मागणं मागितलं आहे. ईश्वरानी ही कृपा करावी आणि सर्वांची बुद्धि शुद्ध करावी. बुद्धिविकास. संतमाहात्म्यांना मान्य आहे. भौतिक विकास पुष्कळ होईल. कर्ज काढून होईल किंवा न मागता कसं का होईना पण होईल. केवळ भौतिक विकासापेक्षा बुद्धि विकासाला महत्त्व आहे. आणि तो बुद्धि विकास अधिकाधिक व्हावा याकरताही सर्व काही आहे. या ठिकाणी सद्गुरु सेवा मंदिर म्हणून आणखी गुरुभक्त भगवंतरावजी यांनी कार्य सुरू ठेवलेलं आहे. ईश्वराची

सेवा आहे. गुरुंची सेवा आहे. अध्यात्मचिंतन आहे. ईश्वराचं भजन आहे आणि अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना अन्नदान आहे, ज्ञानदान आहे ही सगळी व्यवस्था आणखी अशा प्रकारचं आचरण जे संतांनी सांगून ठेवलेलं आहे शिष्टाचार म्हणून, त्याप्रमाणे हे कार्य या ठिकाणी चाललेलं आहे. आणि समष्टीरूपानी ईश्वराचं ह्याला सहाय्य आहेच आहे, होतच आहे. तर या दृष्टीनं तीन दिवसपर्यंत या ठिकाणी एक मोठा याग झाला. दिगंबरा मंत्राचा जपही झाला. त्याचं हवनही झालेलं आहे. ईश्वर भजन किंवा ईश्वर श्रद्धा वगैरे हेही दुरितक्षयाला उपकारक अशा प्रकारचं आहे. ईश्वराची मूर्ति असो किंवा नसो. ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणे मूर्ति आहे म्हणणारेही लोक आहेत नाही म्हणणारेही लोक आहेत. वेदामध्ये आणखी मूर्तीचं प्रतिपादनही केलेलं आहे. निरनिराळ्या रीतीने वर्णन जे आहे ते सगळं अर्थवादात्मक नाही आहे. त्याचाही विचार वेदव्यासमहर्षींनी करून ठेवलेला आहे आपल्याकरता. तर याप्रमाणे आणखी भगवंताची मूर्ति आपल्याला या ठिकाणी प्रत्यक्ष काही दिसू शकत नाही. आज या ठिकाणी प्रत्यक्ष काही दिसू शकत नाही. इथे आणखी तीन दिवसपर्यंत दत्तात्रेयांची पूजा झाली. मूर्ति स्थापन करून ! प्रतिमापूजा आणखी हवन झालेल आहे. "अग्निर्वै देवानाम् मुखं" अग्नीच्या द्वारानी त्या माध्यमातून त्या देवांना ते पूजन पोचलेलं आहे. सर्वांतर्यामी आणि सर्व बुद्धीला प्रेरक अशी एक शक्ती आहे. ही जाणीव बुद्धीला झाली पाहिजे. वाणीचे गुण सांगताना ज्ञानराजांनी कवित्व आहे रसिकत्व आहे असं सांगत शेवटी परतत्वस्पर्श हा वाणीचा महत्वाचा गुण सांगितला आहे. ती वाणी पवित्र आहे. आणि ते मनही पवित्र आहे. अशा प्रकारची बुद्धी पवित्र आहे. सर्व लोकांना मार्गदर्शक ठरणारी आहे असं सांगितलेलं आहे. आणि शेवटी सर्व दुरितक्षय होऊन, आणखी भगवद्भक्ती आपल्या चित्तामध्ये उत्पन्न व्हावी, त्या दृष्टीनं आणखी अशा प्रकारची पुण्यकर्मं ही ठिकठिकाणी चालू आहेत

भारतामध्ये. पहिल्यापासून चालू आहेत. मोठे मोठे संत माहात्मे, आचार्यमहाराज, ज्ञानेश्वरमहाराज, एकनाथमहाराज सर्वांनी आणखी हे करायला सांगितलं आहे. एका भक्ताची प्रार्थना फक्त आपल्याला सांगायची आहे. तीन दिवस याग झाला. तीन दिवस आपण सगळी मंडळी आलात. त्याचप्रमाणे याच्याही पूर्वीपासून प्रयत्न करणारी आणखी सेवा करणारी मंडळीही पुष्कळ आहेत. हे झालं कार्य. परंतु 'सत्कर्म योगे वय घालवावे अस समर्थांनी सांगितलेलं आहे. त्याप्रमाणे आपल्या सर्वही आयुष्यात नित्य काहीतरी आपल्या हातून झालं पाहिजे. आपल्या इंद्रियांनी, देहानी, मनानी, वाणीनी, बुद्धीनी काहीतरी ईश्वरसेवा भक्ती झाली पाहिजे. एका भक्ताची प्रार्थना तेवढी आपल्याला सांगून मी माझं भाषण संपवणार आहे.

**कदा वाराणस्याम् अमरतटीनीरोघसी वसन**
**वसानः कौपिनं शिरसी निजघाणुम्यपिकुटन**
**अये गौरीनाथमं त्रिपुरहर शंभुत्रिनयनं**
**प्रसिदेत्याक्रोशत् निमिषाम् इव नेष्यामि दिवसान्**

वाराणसी तीरावर मला रहायला मिळालं पाहिजे. घर नको बंगला नको. काही नको. आणि त्या ठिकाणी केवळ कौपिन धारण करणं म्हणजे वैराग्यपूर्ण आहे. आणखी भगवद्प्रेमही अंतःकरणामध्ये पूर्ण आहे. आपलं नामस्मरण अखंड माझ्या मुखातून चालावं आणि शेवटचा उल्लेख म्हणजे इतका विलक्षण आहे परिणामकारक !

अनेक दिवस भक्ती झाली तरी ती फक्त एक निमीष झाली ही तळमळ वाटली पाहिजे मनामध्ये. 'प्रसन्न व्हा, माझ्यावर आपली कृपा करा ''निमीषमिव नेष्यामि दिवसान्'' सतत भक्ति व्हायला हवी. एक मिनीट जरी झाली नाही तरी, थोडी भक्ती झाली असं वाटलं पाहिजे.

म्हणजे इतका कर्तृत्वमहिमा दूर झाला पाहिजे. कालमर्यादाही विसरून जायला पाहिजे. केवल कालमर्यादेचं स्मरण करून किवा कालाचं स्मरण करून काय करायचय ? ऋग्वेदामध्ये पहिल्यापासून ही भक्ती श्रद्धा आहे. प्राचीन कालापासून हे आहेच आहे. त्या भक्तीला आणखी उद्दिष्ट आहे. ज्याची भक्ती करायची ते आणखी भजनीय असलं पाहिजे, ते ही त्यांनी सांगितलेलंच आहे. वर्णन आहेच सगळीकडे. तर अशा दृष्टीनं ईश्वराजवळ हीच प्रार्थना करायची आहे आपण, किती दिवस मी भक्ती केली, हे लक्षात राहू नये. आपल्या हातून गुरूभक्ती सत्कर्म, श्रद्धेनी किती दिवस झाली हे विसरून गेलं पाहिजे. हे त्या भक्तानी देवाजवळ मागितलेल आहे. अशी आमच्या मनाची स्थिरता त्या भक्तीमध्ये आणि भगवंताच्या सेवेमध्ये राहिली पाहिजे. म्हणजे आपण आणखी कृतार्थ होऊ शकतो, ही प्रार्थना सफल होण्याकरता म्हणून सर्वांतर्यामी परमेश्वर आहे. सर्व ठिकाणी आहे. आत्मस्वरूप सर्वत्र एक आहे असं आचार्यमहाराज सांगतात. परंतु आचार्य महाराज हे केवळ वैयक्तिक कार्य करण्याकरता आलेले नव्हते. बौद्धमताचा पराभव करण्याचं कारण काय होतं ? त्यांना सर्व समाजाची व्यवस्था करायची होती. बुद्धीभेद करणारे अशा प्रकारचे जे युक्तीवाद आहेत ते युक्तीवाद कसे सदोष आहेत हे त्यांनी दाखवलं. समाजामध्ये असणारी सर्वांची बुध्दी विषम आहे. बुद्धीची समता ही कोणचही अनुशासन करू शकत नाहीये. बाकीचीही समता झाली पाहिजे म्हणतात. झाली नाही, होत नाही, आणि होणारही नाही. बुद्धीची विषमता ही केव्हाही दूर होणार नाही आहे. हे अनेक प्रकारच्या, नाना पंथांनी, नाना पक्षांनी सिद्ध झालं, तर ती बुद्धीची प्रशंसा, म्हणजे योग्यता बुद्धीची ही उत्पन्न होण्याकरता पंचायतन पूजा ही सांगितली आहे. त्याप्रमाणे सर्वही देवतांमध्ये एक परमात्मा आहे ही भावना धारण करून, सर्व देवतांचीही स्तुती त्यांनी केली आहे. भगवतीच सौंदर्य-लहरी स्तोत्र तर किती विलक्षण त्यांनी

केलेलं आहे. वाचन करत असताना आणखी सर्व आपल्याला पाहता येत. आणि शेवटी त्यांनी अस म्हटलं आहे की, ''त्वदीयाभिर्वाग्भिः स्तव जननीवाचां स्तुतीरियं'' हे चरित्र लिहीलं, स्तोत्र केलं परंतु तुझीच वाणी आहे. मी काय केलेलं आहे ? ही अशा प्रकारची आणखी निरहंकार बुद्धी उत्पन्न व्हावी हे देवाजवळ मागायचंय, तर दुरितांचे तिमिर गेल्याप्रमाणे होईल. स्वधर्माबद्दल श्रद्धा भक्ती निर्माण होईल आणि नंतर राज्यशासनानं लक्ष दिलं किंवा दिलं नाही तरीसुद्धा जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ।। एका प्राण्याला नाही, सगळ्यांना मिळू शकेल.

हा त्यांचा आत्मविश्वास हा त्यावेळी प्रगट होईल. आपण सर्व मंडळींनी या ठिकाणी अत्यंत श्रद्धा भक्तीनं, तीन दिवसपर्यंत हा कार्यक्रम केला. श्रद्धा, भक्ती व्यक्त केली, याचं समाधान मुख्य संचालक गुरूभक्त भगवंतरावजी यांच्या मनामध्ये झालेलं आहे. त्याप्रमाणे अशा प्रकारची ज्ञानेश्वर महाराजांनी प्रार्थना केली. समर्थांनी प्रार्थना केली शेवटी. त्यांनी आपलं समाधान व्यक्त केलं. 'तुझा तू वाढवी राजा' हे सांगून मोकळे झाले. माझा काही संबंध नाही म्हणाले. ''त्या राजाला तूच वाढवलं आहेस, तूच वाढिव.'' तर शेवटी एक त्यांना समाधान झालं, ''उदंड जाहले पाणी स्नानसंध्या करावया'' वगैरे वगैरे त्यांचं हे काव्य आहे. एक समाधान त्यांना वाटलं काहीतरी थोडीशी लोकांमध्ये बुद्धी बदलायला लागलेली आहे. त्यांना दुसरं काही नको होतं. लोकांची बुद्धी शुद्ध हवी आणि लोकांचं कल्याण व्हावं इकडेच त्यांचं लक्ष आहे. ईश्वराचे अवतारही याच्याकरिता होतात. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे संतमहात्मेसुद्धा हेच कार्य करीत असतात. भगवद्‌भक्तीमध्ये कर्मयोग आणि भक्तीयोग दोन्ही आहेत. केवळ कर्मयोग उपयोगी नाही. आणि केवळ भक्तीयोगही उपयोगी नाही. दोन्हींचा समन्वय शास्त्रसंमत आहे. तेव्हा कर्म आणि भक्ती हे दोन्ही मिळून कार्य भारतामध्ये ठिकठिकाणी चालू राहिली पाहिजेत. संतमहात्म्यांनी


हे चालू करून दिलेलं आहे. ७०० वर्षे ज्ञानराजांनी हे रोपट लावलेलं आहे. वारीचा पायंडा पाडलेला आहे. वारीला प्रत्येकानी जायला पाहिजे पंढरपूरला. ७०० वर्षे होऊन गेली वारी अखंड चालू आहे. राष्ट्रपतींचा वटहुकूम निघाला तरी हे चालणार नाही हे लक्षात घेण्यासारखं आहे. फार तर २-३ दिवस चालेल. ७०० वर्षे कोण जाणार वारीला ? तर ती ज्याची बुद्धी पूर्ण आहे, अशा महात्म्यांच्या द्वारा होऊ शकतं हे कार्य ! तेव्हा असं हे कार्य ठिकठिकाणी व्हावं, हा आदर्श सर्वांनी लक्षामध्ये आणून ठिकठिकाणी लोकांनीही लक्ष देऊन असं कार्य करून, ईश्वर प्रसादही संपादन करावा आणि ईश्वर प्रसादानी सर्वांचं पूर्ण कल्याण व्हावं, ही सर्वांतर्यामी भगवान दत्तात्रेयांजवळ प्रार्थना आहे.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त ॥**

# अकामभक्त-प्रल्हाद

मानवजन्म प्राप्त झालेला असताना काहीचरी ईश्वराची सेवा घडावी, आपली पापं सर्व नष्ट व्हावीत, ईश्वरकृपेला आपण पात्र व्हावं हे सर्व संतमहात्मे सांगतात. त्यांनी त्याप्रमाणे ईश्वराची सेवा करून जन्माचं सार्थक करून घेतलेलं आहे. ईश्वराचं कार्य कसं होतं तर भगवंतांनी अर्जुनाला जो उपदेश केलेला आहे, त्यात त्यांनी सांगितलं की ''ददामि बुद्धियोगंतं'' मी बुद्धी देतो. मानवाला मी स्वतः बुद्धी देतो. ही एक ईश्वरानी दिलेली बुद्धी वेगळी आहे. 'बुद्धी कर्मानुसारिणी । हा ही एक सिद्धांत आहे. पूर्वी पाप-पुण्य जसं करून, आपण जसे आलो, त्याप्रमाणे आपली बुद्धी तिकडे प्रवृत्त होते. परंतु ईश्वराची ज्याच्यावर कृपा आहे. त्याला उत्तम बुद्धी प्राप्त होते. दैवी संपत्ती म्हणून ज्याला म्हटलेल आहे ती ईश्वराच्या कृपेनी प्राप्त होते. प्रल्हाद ५ वर्षांचा होता. आणि त्याचा पिता हिरण्यकश्यपू त्रैलोक्याचा राजा होता. एखाद्या प्रांताचा मंत्री किंवा त्या मंत्र्याच्या हाताखालचे सहकारी, आणखी कुठल्या कुठल्या खात्याचे मंत्री अशापैकी तो नव्हता. आणखी सगळं विश्व त्याच्या ताब्यामध्ये आहे. परंतु प्रल्हादाची मनःस्थिती वेगळी होती. परमेश्वराच सारख भजन करावं असं त्याला वाटायचं. शाळेमध्ये जरी गेला तरी ईश्वराच्या भजनाकडे लक्ष आहे. सर्वही मुलांनी जे काही पालक असतील किंवा शिक्षक असतील

त्यांच्या सांगण्याप्रमाणे अभ्यास तर करायचाच आहे. पण अभ्यासामध्ये आणखी आपल्याला यश मिळावं, आपली बुद्धी वाढत जावी याकरता ईश्वराची प्रार्थनाआहे. सध्याच्या आणखी विद्यालयांमध्ये संतांच्या ग्रंथांचं वाचन व्हावं, अभ्यास व्हावा इकडे प्रवृत्तीच नाहीये. प्रल्हादाच्या अंतःकरणामध्ये नारदमहर्षींनी आणखी प्रेरणा केलेली आहे. नारदांचे शिष्य प्रल्हादजी. पहिलं नाव आहे भक्तांमध्ये, ''प्रल्हादनारदपराशरपुंडरिक'' पहिल्या नंबरचे भक्त म्हणजे प्रल्हादजी आहेत. त्यांनी आणखी इश्वराचं भजन करावं, भक्ती करण्याकरता, ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता हा जन्म आहे हा त्यांचा पक्का निश्चय झालेला आहे. आत्मानात्म विचारही झालेला आहे. त्यामुळे हिरण्यकश्यपू, त्याचा जो बाप आहे. तो ह्याच्या विरुद्ध आहे. देवाचं भजन-बिजन काही करायचं नाही म्हणाला. कुठला हरी काढलाय, मी सगळ्यांचा ईश्वर आहे. मी मालक आहे पण प्रल्हादजींना ते पटायचं नाही. देव दर्शन, देवाच नामस्मरण करणं त्यांच चालू होतं. शाळेमध्ये गुरुजी कुठे बाहेर गेले की याचं आपलं भजन सुरू झालं. त्या गुरुजींनी जाऊन तक्रार केली, राजेसाहेब हा तुमचा मुलगा म्हणाले याची बुद्धी वेगळी दिसती. आम्हाला काही सांगता येत नाही. त्याला आम्ही शिकवू शकत नाही म्हणाले. त्याला बोलावलं हिरण्यकश्यपूनी आणि विचारलं, '' मी कोण आहे तुला माहिती आहे की नाही ? संपूर्ण त्रैलोक्यामध्ये माझी इच्छा कोणीही मोडू शकत नाही. माझी आज्ञा कोणीही भंग करू शकत नाही. तेव्हा मी इतका मोठा असताना तू माझ्या आज्ञेच्या विरुद्ध कसा वागतोस ? हरीचं भजन करायचं नाही अस सांगितल असताना तू ते करतो आहेस. प्रल्हादजींनी उत्तर दिलेलं आहे आपल्या पित्याला. ''पिताजी सर्व त्रैलोक्य जिंकल आहे असं आपण म्हणता पण स्वतःच मन सुद्धा आपण जिंकलं नाही. आपल्या मनात येईल ते झालं पाहिजे असं तुम्हाला वाटतं. मनाप्रमाणे वागणारे तुम्ही



प. पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर

मनाला जिंकू शकला नाही आणि सगळं जिंकलं म्हणता ! काय जिंकल ? मनाकडे पहा. आपली बुद्धी चांगली आहे की नाही हे पहात चला. आत्मनिरीक्षण करा. त्याचा अभ्यास रोज करा आपण, म्हणजे आपल्याला समजून येईल की आपल्याजवळ किती दोष आहेत, आणि ते दोष दूर करण्याची शक्ती आपल्यामध्ये नाही आहे. ती ईश्वराची शक्ती आहे.'' हे ऐकून त्यांनी प्रल्हादाचा पुष्कळ छळ केलेला आहे. प्रल्हादजींचा छळ प्रसिद्ध आहे. ''प्रल्हादासी पिता करितो जाचणी । परि तो स्मरे मनी नारायण'' किती जरी पित्यानी त्रास दिला, मारण्याचा प्रयत्न केला, सगळी शस्त्रास्त्रं वापरली परंतू काही उपयोग झाला नाही. त्यावेळेला हिरण्यकश्यपूच्या मनावर थोडासा का होईना एक परिणाम झाला, की ''इतकी शस्त्रास्त्रं वापरून मी ह्याला ठार मारण्याचा प्रयत्न करतोय परंतू हा जिवंत आहे. माझ्यापेक्षा कोणीतरी एक शक्ती मोठी आहे काय ? '' अशी एक मनामध्ये कल्पना उत्पन्न झाली पण जवळची जी मंडळी असतात ती अहंकार वाढवणारी आहेत. 'आपण त्रैलोक्याचे राजे. आपल्याला भीती बाळगण्याचं काय कारण आहे ? आपण त्याला गुरुजींकडे नेऊन देऊ शुक्राचार्यांना सांगू ' वगैरे वगैरे सांगितलंय. शेवटी अवतार त्या भगवंताला प्रल्हादाकरता घ्यावा लागला आणि त्याचा जो बाप होता त्रैलोक्याला त्रास देणारा, त्याचा विचार असा, ''मी म्हणतोय तसं झालं पाहिजे, माझी आज्ञा सगळ्यांनी पाळली पाहिजे. मुलगा बिलगा मी काही जाणत नाही. मुलाला सुद्धा मी ठार मारीन'' मारू शकला नाही. पण जी निर्भयता त्या मुलाच्या ठिकाणी उत्पन्न झालेली आहे. ती निर्भयता मोठी आहे. सर्वही वेदव्यास महर्षींनी प्रल्हाद चरित्र वर्णन केलेलं आहे. की ही निर्भयता बुद्धीमध्ये उत्पन्न झाली ती ईश्वरानी दिलेली आहे. ईश्वराच्या कृपेनी निर्भय बुद्धी होती 'अभयंसत्वसंशुद्धिः' भगवद्गीतेमध्ये अभय हे पहिलं लक्षण सांगितलेलं आहे. दैवी संपत्तीच निर्भय असते. भगवंताचा

भक्त निर्भय असतो. कुणीही कितीही त्रास दिला तरी त्याच्या मनावर परिणाम होत नाही. निर्भयपणाने आणि आपलं कर्तव्य जे आहे ते करायचं. संतमहात्मे जस सांगताहेत त्याप्रमाणे आपण वागायचं. त्याची निर्भयता अशी की शेवटी त्याच्या पित्याचा नाश झाला. भगवंताला यावं लागलं आणखी हिरण्यकश्यपूचाही नाश झालेला आहे. त्यावेळी प्रल्हादजींनी पुष्कळ स्तुती केलेली आहे. आणि वर मागायला सांगितला त्यांनी. नरसिंह प्रकट झाले. ''प्रल्हादा काय तुला वर पाहिजे बाबा'' '' मी वर मागण्याकरता तुमची भक्ती करीत नाही'' म्हणाले. ''मी निष्काम आहे. काहीही मला इच्छा नाही. पिता मारत होता म्हणून त्याला मारा', असं मी कुठ म्हटलं तुम्हाला ? माझ्या पित्यापासून मला वाचवा,'' असंही मी म्हटलेलं नाही. तुमची दया वगैरे नको. मला काहीही वर नको.'' हे एक आश्चर्य आहे. संतमहात्म्यांची बुद्धी किती शुद्ध झालेली असते ! परंतु त्या प्रल्हादानी शेवटी आपल्याकरता वर मागून घेतला. ''माझ्या मनामध्ये कोणतीही वासना राहू नये. ''कामानां हृदि असंरोधं भवतस्तु ऋणेवरं'' सात्विक सुद्धा नको. निर्मळ असं अंतःकरण झालं पाहिजे. त्याशिवाय आपली भक्ती राहणार नाही.'' आणि नंतर प्रार्थना केली, 'देवा आणखी एक वर मागू का ? हे जे माझे पिताजी आहेत त्यांचा उद्धार आपण करावा. यांनी द्वेष केला पण ते त्यांचं अज्ञान होतं. मध्यस्थी जो पाहिजे तो असा पाहिजे. शुद्ध बुद्धीचा पाहिजे. 'आपल्याला त्रास दिलेला आहे यानी, जाईना नरकात' असं वाटलेलं नाही. नरकातून काढणारी शक्ती आज आपल्यासमोर आहे. त्या ईश्वराजवळच प्रार्थना करून आणि आपल्या वडिलांचा उद्धार केला. नरसिंहानी उत्तर दिलेलं आहे, अरे, तुझा पिता इतका पवित्र झाला आहे की त्याची सगळी पापं गेलेली आहेत. २१ पिढ्या याच्या पूर्वीच्या आणि हा, हे सगळे पवित्र झाले आहेत. स्वर्ग लोकाला गेले आहेत.'' ''यत्साधोः सकुलेजातः भवान वै कुलपावनः''

देवाला मान द्यायचा भक्तांनी पण इथे देव भक्तालाच मोठेपणा देतो. " या हिरण्यकश्यपूच्या कुळामध्ये तुझ्यासारखा शुद्ध बुद्धीचा भगवद्भक्त निर्माण झाल्यामुळे याचा उद्धार झालेला आहे," पण म्हणून काही त्याला अभिमान झालेला नाही. ही जी खरी, सर्वांचं, शत्रूचंसुद्धा कल्याण व्हावं अशी इच्छा करणारी बुद्धी ही ईश्वराच्या कृपेशिवाय मिळणार नाही आहे. आणि असा बुद्धीचा आपल्या विकास झाला पाहिजे. शुद्ध बुद्धी झाली पाहिजे. काम, क्रोध, द्वेष वगैरे जे विकार मनामध्ये वाढतात. "मला यांनी त्रास दिलेला आहे. याच केव्हा परिपत्य आपण करू" अशी सारखी द्वेषभावना आणि त्यामुळे अशांती मनामध्ये राहते. याप्रमाणे अशी भक्तांची चरित्रं आहेत, ग्रंथ आहेत, महाभारत आहे. भागवत आहे. लहान वयामध्येच ही आवड लागली पाहिजे. देवाचं सान्निध्य पाहिजे. या ठिकाणी गुरुहाराजांचे आहे. आपण सर्वही मुलांना सांभाळणारी मंडळीही प्रेमानी आलेली आहात. स्त्रिया आहेत. पुरुष आहेत. मुलांना वळण लागावं. त्यांची बुद्धी चांगली व्हावी म्हणून रोज देवदर्शन करणं, काहीतरी थोडसं नामस्मण करण हे घडावं. आणखी अभ्यास करून चांगले ग्रंथ आपल्या वाचनात जर राहिले तर त्याच्या योगानी आपलं मन शुद्ध, पवित्र होऊन जात आहे. याप्रमाणे पूर्वीच्या सर्वही ऋषिमंडळींनी सर्वांच्या करताही मार्गदर्शन करून ठेवलेलं आहे. ते अरण्यामध्ये रहायचे. बिचारे काय धान्य बिन्य थोड फार असायच, काय मिळेल त्यामध्ये समाधान मानून

**"सर्वेपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित दुःखमाप्नुयात ॥"**

अशी प्रार्थना करायचे.

हे कल्याण आहे. सर्वांचं कल्याण म्हणजे सुख मिळालं पाहिजे सर्वांना. आपल्याला एकट्यालाच सुख मिळाले पाहिजे अशी इच्छा नाही. सर्वही सुखी व्हावे. त्याचप्रमाणे सर्वांना आरोग्य मिळावं ही प्रार्थना देवाजवळ

करतायत. सर्वे सन्तु निरामयः । शरीर चांगलं असल्याशिवाय काय होणार ? प्रपंच तरी काय होणार आणि परमार्थ तरी काय होणार ? म्हणून कोणालाही आणखी 'आमय' म्हणजे रोगराई होऊ नये. सर्वांचं शरीर चांगलं असावं. सर्वांना बुद्धी चांगली असावी. त्याचं सबंध जीवन मंगलमय व्हावं. सगळं मंगलमय त्यांना पहायला मिळावं आणि सर्वही दुःखांपासून सर्व मुक्त व्हावेत अशी त्या संत माहात्म्यांची इच्छा आहे. स्वतंत्र स्वतःसाठी देवाजवळ ते काहीच मागत नाहीत. ती एक वेगळी बुद्धी आहे. स्वतःचाही त्यात समावेश आहेच आहे. नाही असं नाही. पण मला सुखी करा, असं म्हणत नाहीत. मला संपत्ती द्या. मला आणखी सत्ता द्या अशी प्रार्थना कधीही करायची नाही. सकाम आणखी भक्ती करायचीच नाही. त्याप्रमाणे इथे आपल्याला शिकवणारी ही मंडळी चांगली आहेत. ईश्वराचीच ही योजना आहे. ईश्वरानी, सद्गुरू महाराजांनी, कृपा करून राष्ट्राला उपयुक्त असलेली बुद्धी वाढवावी त्यांनी आणि राष्ट्रकार्य तुमच्याकडून व्हावं एवढीच आणखी गुरू महाराजांच्याजवळ प्रार्थना आहे.

**"अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त"**

# दत्तमाहात्म्य

भगवान दत्तात्रेयांचा अवतार सत्ययुगामध्ये झालेला आहे. पुष्कळ वर्षं झाली. आरंभाला अनसूयामाता आणि अत्रीमहर्षी यांची आणखी निष्ठा, भक्ती आहे. कर्माचरण आहे. त्यामुळे प्रसन्न होऊन भगवान महाविष्णूंनी दत्तात्रेयरूप धारण केलं. दत्तात्रेय रूपामध्ये सर्वही त्यांचे भक्त आहेत. देव आहेत, दैत्य आहेत, गंधर्व आहेत, मानव आहेत. कार्तवीर्यार्जुन हा एक मोठा महाभक्त होऊन गेला भगवंताचा. सर्वयोगसिद्धी त्याला दिल्या आहे. कृतवीर्य हा त्याचा पिता गेल्यानंतर कार्तवीर्यार्जुनाने राज्यावर बसावं म्हणून सर्व मंडळी, प्रधान मंडळी प्रयत्न करतात. पण त्यांनी सांगितलं, मला राज्य करायचं नाही. कारण राज्य म्हणजे सगळं पाप आहे. अपराधी माणसालाही सोडाव लागतं, निरपराधी माणसालाही दंड आहे. चारचक्षु राजाला म्हणतात. चार म्हणजे हेर. हेर हेच त्यांचे चक्षू आहेत. त्याला काही डोळ्यांनी पाहता येत नाही. काही नाही. हे हेर जे सांगतील त्याप्रमाणे खरं मानून राज्य करावं लागतं. म्हणून अन्यायही होईल. तेव्हा, मी राज्य करणार नाही त्यांनी कारण सांगितलं ते बरोबर आहे. पण आता सगळं राजाला समजणार कसं ? ऋषीमंडळी त्याला म्हणाली तुझी इच्छा अशी आहे की, 'राज्यातील सर्व तुला कळायला पाहिजे. त्याशिवाय राज्य तुला करायचं नाही. भगवान दत्तात्रेयांना तू शरण गेलास म्हणजे तुला सिद्धी प्राप्त होईल.' सेवा केली दत्तात्रेयांची.

आणि त्याला सर्व ज्ञान त्यांनी दिलेलं आहे. भगवद्गीतेमध्ये २० काहीतरी गोष्टी सांगितलेल्या आहेत. दहाव्या अध्यायात -

**बुद्धीर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।**
**सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च ॥४॥**
**अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।**
**भवन्ति भावा भूतानाम् मत्तः एव पृथग्विधाः ॥५॥**

हे मीच देतो म्हणाले. तेव्हा सर्वही ज्ञान त्याला व्हावं अशी त्याची बुद्धी त्यांनी तयार केलेली आहे. आता राज्य कर म्हणाले. सर्व तुला कळेल आणि त्याप्रमाणे जाणून तू स्वतः राज्य करशील ही व्यवस्था करून दिली आणि मग कार्तवीर्यार्जुनानी राज्याला सुरुवात केली. कुणीही शस्त्र हातामध्ये घ्यायचं नाही म्हणून त्यांनी नियम केले. कालीदासांनी त्यात वर्णन केलेलं आहे.

**अकार्यचिन्ता समकालमेव चापधर प्रादुर्भूवं चापधारपुरस्तात ।**
**अंतः शरीरेष्यपि यः प्रज़ानाम् प्रत्यात्वयेशु अविनयं विनेतात ॥**


असा नेता एवढा मोठा होता. अकार्याची चिन्ता आहे म्हणजे विचार सुरू झालेला आहे. कुणाचा नाश करायचा अशी दुर्जन मंडळी बसून विचार करताहेत, की त्या ठिकाणी कार्तवीर्यार्जुन धनुष्यबाण घेऊन हजर असायचा. ही स्वयंसिद्धी त्याला दिली होती. वेदव्यासांनी संजयला, "तुला सर्व भारतयुद्ध पाहता येईल. आणि ते पाहून तू धृतराष्ट्राला सांग." अशी सिद्धी दिली होती. त्याप्रमाणे सर्व पाहात होता तो. भगवद्गीतेचा उपदेश संजयालाही ऐकायला मिळाला. त्याप्रमाणे कार्तवीर्यार्जुन, अकार्याचा विचार चालू आहे इतक्यात त्याठिकाणी हजर होत असे. एकाच ठिकाणी नाही. अनेक ठिकाणी दुर्जन मंडळी असायची पण तितकी रूप धारण करणं आणि त्या ठिकाणी लगेच जाऊन पोहोचणं

ही विलक्षण सिद्धी आहे. ज्ञान आणखी क्रिया दोन्हीही आहे. त्यामुळे लोकांमध्ये भिती निर्माण झाली. हा राजा म्हणाले स्वतः येतो, हेरावर अवलंबून नाही. स्वतः सगळं याला कळतं. त्यामुळे मनामध्येसुद्धा आपण दुर्विचार आणणं, बरोबर नाही. अशी आणखी भावना सगळ्यांची झाली. याप्रमाणे लोकांच्या मनामध्ये भीती निर्माण करून, आणखी दुर्वर्तनापासून त्यांना बाजूला करण्याचा प्रयत्न, कार्तवीर्यार्जुन आपला राज्यकारभारामध्ये एकटा करत होता. रावणालासुद्धा भीती होती. असं राज्य त्यांनी ८० हजार वर्षापर्यंत केलं म्हणतात. परंतु लोकांची आणखी दुष्ट प्रवृत्ती तेवढ्यापुरती बाजूला व्हायची. कार्तवीर्यार्जुन येईल आणि आपल्याला शिक्षा करेल. या भीतीमुळे लोक दुर्वर्तनापासून बाजूला व्हायचे. नैसर्गिक जी प्रवृत्ती आहे मनाची, संस्कार जे वाईट आहेत, हे त्या बुद्धीला झालेले आहेत. इतकी बुद्धी सुधारणं फार कठीण आहे. शेवटी कार्तवीर्यार्जुनालासुद्धा ते नको वाटलं. कंटाळला. किती दिवस करायचं म्हणाला. पुन्हा दत्तात्रेयांच्याकडे शरण गेला तो. काही बोलले नाहीत. एक दिवस झाला. दोन दिवस झाले. काही नाही. भाषण नाही. ऋषीमंडळी म्हणाली, ''महाराज आपला प्रिय भक्त आलेला आहे. आपण भाषण ही केले नाही?'' ते म्हणाले ''त्याला आणखी काही सिद्धी पाहिज असेल ती मागून घे आणि जा'' म्हणाले इथं थांबू नकोस.'' त्यांनी हात जोडले, ''महाराज ही मला दिलेली सिध्दी तुम्ही परत घ्या म्हणून सांगण्याकरता आलो आहे. नको मला हे ज्ञान नको. लोकांना शिक्षा करणं नको आणि त्याचा काही उपयोग होत नाही,'' मग दत्तात्रेयांनी त्याला योगाचा उपदेश केला. ज्ञान सांगितलं आत्मानात्मविचार सगळं त्याला समजून सांगितलं. त्याच्या मनात वैराग्य निर्माण झालं. त्यामुळे तो अधिकारी झाला आणि अशा कार्तवीर्यार्जुनाचा उद्धार भगवान दत्तात्रेयांनी केला. मोठा शिष्य ! तो स्वतः असताना काय होत असेल कुणास ठाऊक, पण

आज सुद्धा त्या कार्तवीर्यार्जुनाचं नामस्मरण केलं, काही मंत्रोच्चारण केलं तरीसुद्धा आपली इच्छा पूर्ण होते. ‘‘गत नष्टं च लभ्यते।’’ म्हणतात. इतकी शक्ती ही त्याच्यामध्ये भगवान दत्तात्रेयांच्या कृपेनी अद्यापि कायम आहे. यदुराजाही तसाच झाला. दुःखी झाला होता बिचारा. ययाती राजा त्याचा पिता, त्याला शुक्राचार्यांनी शाप दिल्यामुळे वृद्धापकाळ प्राप्त झाला. शुक्राचार्यांना शरण गेला. ‘‘माझ्या विषय वासना अद्यापि आहेत आणि मी वृद्ध झालो ’’ शुक्राचार्य म्हणाले, ‘‘ जर तुझ्या मुलांपैकी तुला कोणी आपलं तारूण्य देत असेल तर ते तारूण्य तू घे आणि वृद्धत्व त्यांना दे ’’ केवढी विलक्षण संकल्पसिद्धी या तपस्वी पुरूषांची ! त्यामुळे त्यांच्या तपावर विश्वास असणारे जे लोक आहेत हे काहीही आज्ञा पित्याची झाली तरी मान्य करतात. रेणुका माता द्वारामध्ये उभी आहे. ‘‘ आत यायचं नाही.’’ आज्ञा झाली. तिच्या मुलांना सांगितलं, ‘‘ हिला मारून टाका.’’ मुलं कशी मारतील आईला? इतक्यात वनातून परशुराम आलेले आहेत. ‘‘ हे तुझे भाऊ आणि तुझी आई या सगळ्यांचा शिरच्छेद कर’’ म्हणाले. काही विचार नाही. परशु बाहेर काढलेला, सगळ्यांचा शिरच्छेद केला. केला म्हणाले, जमदग्नी महर्षी संतुष्ट झाले, आणि म्हणाले, काय पाहिजे तो वर मागून घे,’’ म्हणाले, वर मागितला, ‘हे जिवंत व्हावेत आणि यांना मी मारलेलं आहे, असं स्मरण राहू नये.’ तो वर दिला, आणि मृत झालेले ते जिवंत झाले.

**पितृविव्दांस तपोवीर्यं चक्रे मातृवधाधिकं ।**

पित्याच्या तपाचं काय सामर्थ्य आहे हे जाणणारे परशुराम होते. ‘आईला मार’. मारून टाकलं. पाप पुण्याचा विचार नाही. जिवंतही केलयं. तर अशा रितीनं शुक्राचार्यांनी सांगितल्यानंतर आणखी ययाती राजाने हा ज्येष्ठं पुत्रं यदु. देवयानीचा मुलगा. त्याला विचारलं ‘‘माझं म्हातारपण काही दिवस सांभाळशील का? तुझं तारुण्य मला दे’’ तो



म्हणाला ''पिताजी म्हाताऱ्याला पाहूनच आम्ही घाबरतो , ते म्हातारपण घ्यावं म्हणता!

'' मी काही घेणार नाही म्हातारपण'' दुसरा मुलगा गेलेला आहे. शर्मिष्ठेची ३ मुलं होती त्यापैकी दोघांनीही नाकारलं सर्वात कनिष्ठ मुलगा पुरु, तो म्हणाला, '' मी तुमच वृध्दत्व घेतो. माझं तारुण्य तुम्ही घ्या. राज्य करा'' म्हणजे अदलाबदल करण्याची संकल्पशक्ति त्या ऋषीमंडळींनी त्याला दिली. पुष्कळ वर्ष राज्यं केलं आणि नंतर ययाती राजा वनामध्ये निघालेला असताना आपल्याला उपयोगी मुलगा जो आहे, तो सर्वात धाकटा आहे, राज्य ज्येष्ठ मुलाला द्यायचं आहे वास्तविक, पण हा पितृ भक्त आहे, तोच राज्याचा आधिकारी होईल म्हणून त्याच्या ताब्यामध्ये राज्य दिलं आणि बाकी चार बंधू त्यांना, ''त्याच्या हाताखाली याची आज्ञा पालन करुन तुम्ही राज्य करा. तुम्हाला राज्याचा आधिकार नाही ,'' म्हणून सांगून ययाती राजा वनामध्ये गेला. त्यामुळे यदु राजाला दुःख झालं. तो मोठा मुलगा, राज्याचा आधिकारी असताना त्याला राज्य मिळालं नाही ना! सबंध आणखी भूमीवर फिरता फिरता भगवान दत्तात्रेय वनामध्ये एका झाडाखाली पडलेले आहेत. पूर्ण शक्ती आहे. सर्व शक्ती आहे. कार्तवीर्यार्जुनासारखे भक्त आणखी ज्यांनी निर्माण केले. शक्ती दिली. पण त्या शक्तीची आणखी आठवणही नाहीये. स्वस्थ पडून आहेत. यदु राजाला त्यांच्या जवळ गेल्याबरोबर आनंद वाटला. नमस्कार केला. आणखी विचारलं, ''महाराज, आपण इथं झाडाखाली का पडून राहिला? तुमच्या जवळ काही पात्रं नाही. काही सामग्री नाही. जेवणाखाण्याची व्यवस्था काय? पैसे नाही. पैसे असतील तर काही खाण्यापिण्याचे पदार्थ आणता येतील. इतका आनंद ! तुमच्याजवळ काही साम्रगी नसताना इतका आनंद तुम्हाला कसा मिळाला?'' हा प्रश्न आहे यदुराजाचा ! संपूर्ण सामग्री आपल्याजवळ पाहिजे. असती तर ती सुध्दा

कमी पडत आहे. आम्हाला कितीही संग्रह केला तरी अजून पाहिजे आहे.

आपल्याला पुरलं पाहिजे. आपल्या मुलाबाळांना, नातवंडांना आणखी इतर मंडळींना पाहिजे तेवढं साठवितो आपण पण तृप्ती नाही. लोभ वाढतो आहे. त्यामुळे संग्रह करावा लागतो. यदुराजानी विचारलं, ''महाराज काहीही आपल्याजवळ धन वगैरे नाही. धनाकरता आपण प्रयत्न ही करत नाही. आणि इतका आनंद मिळाला कसा?'' तर त्यांनी उत्तर दिलेलं आहे. यदुराजाला, ''सुखं अस्यं आत्मनः रुपम् ।'' सुख म्हणजे आत्मरुप आहे. आत्मा हा अनंगरुप आहे. स्वतःच्या स्वरुपाचा तो आनंद आहे. त्याच्याकरता आणखी प्रयत्न करायचा. हे बाहेरच्या संग्रहानी, धनसंग्रह वगैरे यांनी जे सुख मिळाले ते सगळं आणखी नश्वर आहे. संपून गेलं. धन संपलं की ते सुख संपलं. त्याला पुष्कळ उपदेश केला. आणखी आपली वृत्ती कशी आहे तीही त्याला सांगितली, ''मी म्हणाले काहीही इच्छा करीत नाही इच्छा करुन प्रयत्न करणारे, सर्वही व्यवहार करणारे सर्व लोक, सर्व जीव हे दुःखामध्ये सापडलेले आहेत पूर्ण सुख त्यांना मिळत नाही. म्हणून मी काहीही करायचं नाही, ठरवलेलं आहे.'' गुणातीत अवस्था आहे ती. पूर्ण ज्ञानसंपन्न आहेत भगवान. आणि मग हे ज्ञान कसं मिळाले? त्याच्या करता २४ गुरुंची कल्पना त्यांनी सांगितली ''मी'' म्हणाले '' २४ गुरु केले ज्ञान मिळवण्याकरता. गुण कोणचा आणि दोष कोणाचा हे दोन्ही समजलं पाहिजे, दोष टाकण्याकरता समजला पाहिजे आणि घेण्याकरता गुणही समजला पाहिजे. त्याकरता हे सगळे गुरु मी केलेले आहेत 'हेयोपादेय विवेक'ज्याला म्हणतात. हेय काय? टाकायचं काय? घ्यायचं काय हेच समजत नाही आपल्याला, जगामध्ये लोक कसं वागतील तसं करावं, तसं मिळवावं. आपल्या मनाचा निश्चयं पूर्ण काहीच होत नाही. तो विवेक पक्का झाला पाहीजे.'' तो विवेक पक्का होण्याकरता म्हणून २४ गुरुंची कथा त्यांनी सांगितली .

पृथ्वी, जल, पंचमहाभूतं हे गुरुच आहेत. पंचमहाभूतामध्ये काय काय गुण आहे तेही त्यांनी सांगितलेलं आहे. आणि ही गुणग्राहक बुध्दी.

**" जो जो जयाचा घेतला गुण । तो तो मी गुरु केला जाण "**

नाथ महाराजांनी वर्णन केलेलं आहे. आणि अशी एकदा बुद्धी आपल्याला निर्माण झाली म्हणजे काही घरदार संसार वगैरे सोडून जाण्याचं कारण नाही म्हणाले. ज्याचे गुण असतील ते घ्यायचे. दोष असतील ते सोडून द्यायचे. उपेक्षा करायची. यदु राजाला हा उपदेश केला आणि त्यालाही कृतार्थ केलं. अलर्क हाही मोठा राजा. मदालसेचा मुलगा आहे. मदालसा ही ब्रह्मज्ञानी स्त्री. अनेक जन्माची आणखी तपःश्चर्या. ईश्वरकृपा, सद्गुरुंची कृपा. त्यामुळं पूर्ण ज्ञान संपन्न झालेली, मदालसा. तिला मुलगा झाला पहिला. राजानी येऊन त्याचं नाव 'सुबाहू' असं ठेवलं. ती हसली. दुसरा मुलगा झाला त्याचंही नाव असंच काहीतरी विक्रांत वगैरे ठेवलं असेल. दत्तमाहात्म्यामध्ये या सगळ्या कथा आलेल्या आहेत. आणि सगळ्या त्या दोन्ही, तिन्ही मुलांना त्या ब्रह्मज्ञानी मदालसेनं उपदेश केलेला आहे. लहानपणामध्ये कळत नाही हे. अज्ञानी आपल्यासारखे लोक, प्रारब्धाधीन असलेले, त्यांना कळत नाही. कितीही मोठा अधिकारी सांगणारा भेटला तरी कळत नाही. संजयच्या द्वाराने गीता ऐकली धृतराष्ट्राने, पण त्याच्या मनावर काहीही परिणाम झाला नाही तशीच स्थिती आहे. मदालसा अधिकारी आहे आणि २/३ मुलेही पूर्वसंस्काराने अधिकारी होती. पाळण्यामध्ये निजलेली असताना मदालसेने उपदेश करावा. त्याने ती ज्ञानी झालेली आहेत. पूर्ण ज्ञान. शरीराचा काही संबंध नाहीये. कुठं पडले काय, अंगाला माती लागली काय, काही लक्ष नाही. खाण्यापिण्याची शुद्ध नाही. राजाची आणखी वृत्ती वेगळी आहे. मदालसेची योग्यता त्याला माहिती नाही आहे. राजाने विचारलं, "बाई तू असं काय शिकवलंस मुलांना?" वेदान्त वाक्याप्रमाणे आत्मज्ञान झालेला माहात्मा तो व्यवहाराला

अनुसरूनच वागेल असं नाही. व्यवहार त्याच्या लक्षात असेल तर बरं आहे. व्यवहाराकडे काही लक्षच नाही ना! लोकव्यवहाराच्या विरूद्ध ही मुलं, यांना काय शिकवलंस तू ?'' चौथा मुलगा झाला. त्याचं नाव 'अलर्क' असं ठेवलं. आणि ''याला मात्र तू अशा प्रकारचं शिक्षण देऊ नकोस. चांगला व्यवहारी राजा झाला पाहिजे हा'' असं राजाने सांगितलं, पतीची आज्ञा आहे आणि त्याचं नशिब आहे. त्याला ब्रह्मज्ञानी होण्याला आणखी लांब काळ आहे. आत्ता ज्ञान मिळणार नाही. आई जरी असली तरी राजाने त्याला सर्व शिकवलं आहे. अलर्काच्या स्वाधीन राज्य करून आणखी माता, पिता निघून गेलेले आहेत. जाता जाता मदालसेनं एक पेटी केली होती. त्या पेटीत एक कागद लिहून ठेवला होता. हातात बांधत जा म्हणाली. आणि तुझ्यावर काही संकट ज्यावेळेला येईल त्यावेळेला हे उघडून पहा. म्हणजे तुला मार्गदर्शन होईल. मार्गदर्शन करणारे गुरू प्रत्यक्ष जवळच पाहिजेत असं नाही. ती वेळ आली की त्याप्रमाणे होऊन जातं. बरीच वर्षं अलर्काने राज्य केलं. त्याचा बंधू सुबाहू, त्याला वाटलं आपण सगळे मुक्त झालो,आणि एकटाच आपला भाऊ हा असा राहिला. यालाही बाहेर काढलं पाहिजे. म्हणून त्याने त्याला निरोप पाठवला, ''तू काही एकटा राजा नाहीस'' म्हणाले. ''आम्हीही अधिकरी आहोत. आम्हाला राज्य दिलं पाहिजेस तू'', आता तो अलर्क इतके दिवस राज्य ताब्यामध्ये आहे. तो कसा देईल? लढाई झाली. त्या सुबाहूने आणखी त्याला जिंकलं.सगळ्या सैनिकांना सांगून ठेवलं. हा जर कुठे बाहेर जात असला तर सोडून द्या. धरू नका याला. पराजय झाल्यामुळे दुःख झालेला अलर्क नगराच्या बाहेर पडलेला आहे. वनामध्ये काही ऋषीमंडळींची भेट झालेली आहे. त्यांनी सांगितलं,'' राजा, भगवान दत्तात्रेयांना तू शरण जा. म्हणजे तुझं दुःख जाईल . ब्रह्मज्ञानी मातेचा मुलगा तू होतास.'' सामान्य नाही अधिकार. मोठा अधिकार. पण वेळ आली नव्हती. आत्तापर्यंत

राज्यामध्येच सगळी आसक्ती होती. त्यातच गेला सगळा काळ. दत्तात्रेयांच्या जवळ शरण आलेला आहे,“ महाराज, माझं दुःख दूर करा. मी दुःखी आहे ”. शब्दामध्येही सामर्थ्य आहे. अधिकारी ज्ञानी माहात्मे होते ते. त्यांनी विचारलं, “ तू दुःखी आहेस? तू म्हणजे कोण दुःखी आहे? सांग बाबा.” म्हणाले प्रश्नाबरोबरच त्याला ज्ञान मिळालं. मी म्हणजे कोण? देह म्हणजे मी. अन्नमय कोष, प्राणयम कोष, मनोमय कोष,विज्ञानमय कोष, आनंदमय कोष सगळे कोष बाजूला केले, खरा‘मी’ सापडला त्याला आणि तो तर आनंदरूप आहे. “मी दुःखी आहे म्हणून माझं दुःख दूर करा” अस म्हणून शरण आलेला अलर्क, ‘दुःख नाहीच’ म्हणाला. ‘मला दुःख नाही’ ही अवस्था त्या अलर्काच्या भाग्याने आली. आधीही आली असती पण प्रतिबंध आहे, प्रारब्धकर्म आहे . त्यामुळे ब्रह्मज्ञानी माताही त्याला सुधारू शकली नाही पतीच्या आज्ञेमुळं. भगवान दत्तात्रेयांनी त्याला सर्वही तत्वज्ञान सांगितलं.असे अनेक भक्त झालेले आहेत भगवान दत्तात्रेयांचे. त्यांनीच आणखी श्रीपादश्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती हे दोन अवतार कलीयुगात धारण केले. गाणगापुरामध्ये, नरसोबाच्या वाडीमध्ये त्यांचं स्थान आहे.पादुका आहेत. पुष्कळ मंडळी आर्त आहेत. जिज्ञासू आहेत. अर्थार्थी आहेत. ज्ञानी आहेत. सर्व प्रकारची मंडळी त्या त्या स्थानामध्ये जातात आणि दत्तात्रेयांच्या कृपेन पूर्ण मुक्त होतात. नारायण स्वामी महाराज,२०० वर्ष झाली असतील साधारण. शाब्दज्ञान पूर्ण आहे. शास्त्र सगळं समजलेलं आहे. परंतु उत्तम प्रारब्ध आहे. गुरूंच्या सांगण्याप्रमाणे नरसोबाच्या वाडीमध्ये येऊन राहिलेले आहेत आणि दत्तात्रेयांनी त्यांना संन्यास दीक्षा दिली. उपदेश केला आणि भगवंतांचं ध्यान, स्मरण करीत अखंड त्यांचा काल शेवटपर्यंत नरसोबावाडीमध्ये गेलेला आहे. असे ज्ञानी भक्तही आहेत. अद्यापि पादुका त्या स्थानी आहेत. पादुका हे परमेश्वराच स्वरूप आहे.ही भावना मात्र आम्ही पहात असताना आमच्या मनामध्ये निर्माण होत नाही. त्यामुळे एक मूर्ती

आहे.पादुका म्हणून ज्या आहेत,त्याला देव कसं समजायचं ? असं काहींना वाटतं. पण देवत्वाची भावना झाली पाहिजे. ती भावना होऊन त्या ठिकाणी जाणाऱ्यांना अद्यापिसुध्दा पुष्कळ अनुभव येताहेत.जी जी इच्छा असेल, सांसारिक काही अडचणी असतील त्याही दूर होतात.संकट दूर होतात.जिज्ञासा आहे.कोणीतरी योग्य मार्गदर्शक भेटला पाहिजे. आणि सद्गुरूंची भेटही त्याला होती आहे. तोही कृतार्थ होतो आहे.५०० वर्षे होऊन गेली अद्यापि त्या स्थानामध्ये अनेक भक्तांची कार्यं' चालू आहेत. दत्तात्रेय अवतार तर आहेच आहे. मूळ त्या दत्तात्रेयांचा सर्वत्र संचार होतो असे सांगतात. सकाळी उठल्यावर संध्याकाळपर्यंत सर्वही भारतामध्ये फिरून येतात. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी एका स्तोत्रामध्ये त्यांची दिनचर्या लिहिलेली आहे.

**दिनचर्येचे स्तोत्र**


**यस्यास्ति माहुरे निद्रा निवासः सिंहपर्वते ।**
**प्रातःस्नानंच गंगाया, ध्यानं गंधर्व पत्तने ।**
**कुरुक्षेत्रेच आचमनं धूतपापेश्वरे तथा विभूतीधारणं ।**
**प्रातः संध्याच करहाटके कोल्हापूरेस्य भिक्षांच ।**
**पांचालेच भोजन, तिलको विठ्ठलपुरे ।**
**तुंगापानं दिने दिने, पुराणः श्रवणं यस्य**
**नर नारायणाश्रमे, विश्रामो रैवते ।**
**सायंसंध्या पश्चिम सागरे ।**

काय विमानात बसून तरी, इतकं फिरता येइल का ?

काशीमध्ये स्नान करायचं, संध्येला कऱ्हाडला यायचं, भिक्षा कोल्हापूरमध्ये मागायची, आणि पांचाळेश्वरला गोदावरीच्या तीरावर येऊन भोजन करायचं. कार्तवीर्यार्जुन सर्व ठिकाणी जसा फिरत होता ना त्याप्रमाणे दत्तात्रेय सर्व ठिकाणी संचार करतात. रोज त्यांना भेटतात. त्यांच्यामध्ये

कोण भक्त आहेत कोण संसारी आहे. त्याचीही इच्छा पूर्ण करावी, विरक्त असेल तर त्यालाही आणखी ज्ञानी करायचं आणि सगळं कार्य स्वतः पाहून करताहेत. त्यामुळे या अवतारामध्ये देव दैत्य हे सगळे त्यांचे शिष्य आहेत आणि हा अवतार अखंड राहणार आहे. यांना गुरु कोणी नाही हे विशेष आहे. रामचंद्राला वसिष्ठ गुरु होते. श्रीकृष्णांना सांदीपनी होते. दत्तात्रेय सगळ्यांचे गुरु आहेत. स्वतः त्यांना गुरु नाही. सर्वज्ञान पूर्ण आहे. तर अशारीतीने, अखंड अवतार, 'स्मर्तृगामी' त्यांना म्हणतात. स्मरण केल्याबरोबर येणारे, काही वेळ नाही, दिरंगाई नाही. म्हणजे दया आहे. भक्तांच्याबद्दल. तेव्हा या दृष्टीने दत्तात्रेयांचं माहात्म्य, सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी मुद्दाम ओवीबद्ध मराठीमध्ये लिहिलेलं आहे. दत्तपुराणामध्ये त्या कथा आलेल्या आहेत. पण भक्तीयोग म्हणजे कसा आहे हे समजून सांगण्याकरता हे सबंध ५१ अध्यायांचं हे चरित्र आहे. केवळ दत्तात्रेयांचे. त्यात श्रीपादश्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती, ह्या अवतारांचं, काही वर्णन नाहीये. तेव्हा अशा दृष्टीने कलीयुगामध्ये आणखी भगवान दत्तात्रेयांचं स्थान, त्यांचं मार्गदर्शनही आणखी पुष्कळ लोक मिळवत आहेत. उपासना करताहेत. आणि त्या उपासनेमुळे जन्म-मरणाच्या आणखी प्रवाहातून त्यांना मुक्त होता येईल. दत्तात्रेयांच्या प्रसादाकरता या ठिकाणी मुक्तहस्ते दत्तयागही पार पडलेला आहे. ताई महाराजांच्या इच्छेनी आणि मार्गदर्शनानी उत्तम प्रकारानी याग पार पडलेला आहे. ईश्वराचे स्मरण करून आणखी त्याची पूर्णता झाली आहे. शेवटी परमेश्वराचं स्मरण करून कर्म सांग होत असतं. बुद्धीही त्यांनीच द्यायची आणि बुद्धीप्रमाणे सुरू केलेल कार्यही त्यांनीच पूर्ण करायचं. ह्या दोन्ही शक्ती आहेत. बुद्धीला प्रेरणा करणं ही ईश्वराची शक्ती. सर्व ठिकाणी दत्तयाग होत नाहीत. अनेक प्रकारची आणखी कितीतरी कार्यं चालू आहेत प्रपंचामध्ये. पण इश्वराचं अस्तित्व मान्य करणारी ही जी भक्तमंडळी आहेत, त्यांच्या

मनामध्ये प्रेरणा होऊन आणखी हे अशा प्रकारचं कार्य अल्प का होईना पण चालू आहे. आणि त्यामुळे सर्वांचं कल्याण होणार आहे. ईश्वरकृपा ही मुख्य आहे. आणि त्या परमात्म्याने अनेक अवतार धारण केलेले आहेत. जरी दृश्यरूपाने दिसत नसले तरी ते दत्तात्रेय अदृश्यरूपाने आहेत. श्रीपादश्रीवल्लभ, नृसिंह सरस्वती हे शेवटी अदृश्य झाले. काही काळ प्रकट होऊन त्यांनी कार्य केले पण नंतर ते अदृश्य झाले. म्हणजे आमच्या डोळ्यांनी दिसत नाहीत. पहाण्याची योग्यता आमची नाहीये. अद्यापि ती योग्यता मिळवण्याकरिता काही तरी प्रयत्न केला पाहिजे असं दिसून येतं. दिसत नाही म्हणून नाहीच असं म्हणायच नाही. नास्तिकता जर उत्पन्न झाली तर त्याच्यासारख दुसरं पाप कोणत नाही. ती नास्तिकता आपल्या बुद्धीमध्ये उत्पन्न होऊ नये. आमची ती योग्यता नाही म्हणून ते आम्हाला दिसत नाही. परमात्मा साक्षात्कार प्रत्यक्ष ज्यांना झालेला आहे अहा प्रकारच्या महात्म्यांची चरित्रं प्रसिद्ध आहेत. त्यांनी पाहिलं आणि आम्हाला पाहता येत नाही. म्हणजे आमच्याजवळ काहीतरी कमीपणा आहे. दोष आहे. तो दोष दूर होण्याकरता आपण प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे ईश्वराचा साक्षात्कार होईल. ही भावना मनामध्ये राहून जर आणखी उपासना अखंड झाली तर त्या उपासनेचं फल हे अनुभवाला आल्यावाचून काही रहात नाही. तेव्हा आज या ठिकाणी काही थोडीशी सेवा झाली. देवालाच इथं बोलवण्यासारखं झालं. या प्रमाणे काही थोडसं गुणचिंतन, गुणानुवाद ज्याला म्हणतात, नामस्मरण आणखी गुणस्मरण झालं. अनंत गुण भगवंताचे आहेत. अनंत शक्ती आहेत. त्यामुळे आणखी त्या शक्तीच्या प्रभावाने प्रारब्धामध्ये सापडलेल्या अनेक भक्तांचा उद्धार भगवान दत्तात्रेयांनी केलेला आहे. देवीचं माहात्म्य त्यांनी मुद्दाम सांगितलं आहे. तर अशा रीतीनं अशीच भक्ती आपल्या चित्तामध्ये परमेश्वराच्या कृपेन निर्माण व्हावी, दृढ व्हावी आणि त्याच फल म्हणजे भगवंताचा साक्षात्कार ज्याला



म्हणतात, तो व्हावा. याच नेत्रांनीही भगवान दिसू शकतो. किंवा नवीन दृष्टीही भगवान देत आहेत. अर्जुनाला दिव्य दृष्टी दिली, तू या नेत्रांनी पाहू शकणार नाहीस, म्हणाले. म्हणून त्याला दिव्यदृष्टी, ज्ञानदृष्टी देऊन विश्वरूप दाखवलेलं आहे. त्यांची इच्छा पूर्ण केलेली आहे. त्याप्रमाणे भगवंताची कृपा सर्वांवर असावी. भगवद्भक्ती सर्वांच्या अंतःकरणामध्ये निर्माण व्हावी अशी भगवान दत्तात्रेयांच्या जवळ प्रार्थना आहे.

**। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।**

# 'एक तरी ओवी अनुभवावी'

'सुहृद' या शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी "प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम् ।" असा केला आहे. ईश्वराला आपली पूजा करावी, आपल्यावर उपकार करावे, आपली सेवा करावी, अशी काही इच्छा नाही. त्यामुळे काहीही उपकाराची अपेक्षा नसताना उपकार करणारा परमात्मा आहे, हा वात्सल्यभाव आहे. हे आहे भक्तवात्सल्य ! वात्सल्य शब्दाचे अर्थही शास्त्रकारांनी दोन प्रकारे केलेले आहेत, आपले आश्रितभक्त आहेत त्यांनी कितीही दोष केले, तरी त्या दोषांना दोष म्हणून न समजता ते गुण आहेत असे समजणे, हा एक वात्सल्य शब्दाचा अर्थ. हा जर अर्थ घेतला तर 'दोषेषु गुणत्व बुद्धीः' हा भ्रम होईल. म्हणून ती व्याख्या बदलली 'तद् दोष अदर्शनं वा वात्सल्यम् ।' आश्रीत जो आहे, भक्त जो आहे त्याचे दोष परमेश्वराला दिसतच नाहीत. अदर्शनम् हे वात्सल्य भगवंताचे असल्यामुळं सर्व संतमहात्म्यांची प्रवृत्ती भक्तीमार्गाकडे झालेली आहे. कोणतेही दोष भगवंताच्या लक्षातच राहत नाहीत. इतका उपकारी भगवान आहे. कोणत्याही प्रत्युपकाराची त्याला अपेक्षा नाही. यामुळे भगवत्भक्तीकडे प्रवृत्ती आहे. या रूपाने भगवंताच्या स्वरूपाचे ज्ञान झाले म्हणजे शांती मिळते. ईश्वर स्वरुपाचे पूर्ण ज्ञान होण्याकरता म्हणून श्रवण, मनन, निदिध्यासन यांची आवश्यकता आहे. उपनिषद भाष्य आहे. संतमहात्म्यांचे ग्रंथ आहेत. त्यांचं श्रवण, मनन, निदिध्यासन अखंड चालू

राहिलं पाहिजे. त्या श्रवण, मनन, निदिध्यासनालाही, साधनचतुष्टय संपत्ती आरंभालाच सांगितली आहे, त्याशिवाय श्रवणाचा अधिकारी होत नाही. संन्यासाश्रम हा उपयुक्त आहे. कारण सर्वसंगपरित्याग केलेला आहे. ममता सगळी संपलेली आहे. तर ही ममता त्याज्य झाल्यामुळे आता केवळ आत्मश्रवण व्हायला पाहिजे. तर दर्शन करायचे ही उत्कंठा आहे. मुमुक्षा तीव्र आहे आणि त्यामुळे प्रवृत्ती झाल्यानंतर त्याचं लक्ष दुसरीकडे कुठेही नाही. त्या मध्येही तो नित्य -निरंतर निमग्न असणार. या साधन चतुष्टय संपत्तीमध्ये शमाला प्राधान्य दिलेल आहे. सदैव वासना त्याग, म्हणजे शम असे आचार्य महाराज म्हणतात. मनातल्या वासना कमी झाल्या पाहिजेत. निर्वासन मन होणं, तो खरा अधिकारी पुरुष आहे. निदिध्यासनाचा, श्रवणाचा, ईश्वर दर्शनाचा अधिकारी ! जितके अंतःकरण निर्वासन होईल तितके ते अधिकारी आहे. त्यामध्येही भगवत्पाद सांगतात. ही सिद्धी म्हणजे निर्वासन अंतःकरण होण, मनामध्ये कोणतीही वासना न रहाणं, ही भूमिका तयार झाल्याशिवाय श्रवण नाही. ही भूमिका तयार व्हायची म्हणजे पूर्वांग आणि उत्तरांग त्यांनी सांगितले आहे. ''तीव्र विरक्ती पूर्वांग निरिच्छांग समागयः ।'' तीव्र वैराग्य ज्याला म्हणतात ते पूर्वांग आहे. त्यात शमादि साधन आहेत आपल्या शमादि साधन संपत्तीमध्ये 'उपरती' म्हणून एक आहे. शास्त्रज्ञ उपरती शब्दाचे दोन अर्थ करतात. पूर्ण व्यवहार निवृत्तीः ।' व्यवहारातलं लक्ष पूर्णपणे बाजूला झालं पाहिजे. काहीही व्यवहार मनामध्ये नाही. भागवतामध्ये एक कथा आलेली आहे. रहूगण नावाचा राजा आहे. त्याला जडभरत उपदेश करतात. आरंभाला त्याच्या शिपायांनी जडभरताला धरून आणलं. पालखी धरायला दिली तरी मानापमान काही नाही. पण नंतर त्यांचं खर ज्ञान किती ! केवढा ज्ञानी महात्मा आहे ! हे कळल्यावर तो रहूगण राजा शरण आलेला आहे. आणि जडभरतानी राजाला उपदेश केला. त्यावेळी त्या

रहूगण राजानी एक प्रश्न विचारला आहे. व्यवहारापासून निवृत्त व्हायचं, संसार सोडून जायचा तर संसार खोटा आहे असं कुठाय ? संसार खरा आहे की ! खोटा असेल तर सोडून द्यायचा ' संसार असल्यावर, संसार संबंध आहे. त्यांनी उदाहरण दिलेलं आहे. पातेलं ठवलं आहे, चुलीवर. खाली लाकडं पेटलेली आहेत. पातेल्यामध्ये पाणी आहे. तर लाकडं पेटल्यानंतर ते पातेल तापलं आणि पाणीही तापलं. त्यात तांदूळ घातल्यानंतर तांदूळही शिजून भात तयार झाला. तांदूळ शिजलेले दिसतात ते खरच आहे की म्हणाले. त्याप्रमाणे देह, इंद्रिय, प्राण, स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर सर्वांशी संबंध ठेवणारा आत्मा, त्याला संसार नाही. सुखदुःख नाही. अस समजायचं कसं ? तेव्हा हे सगळं खरं वाटतंय, असं त्यांनी उत्तर देताना आरंभाला स्पष्टपणे उत्तर दिलेलं आहे. तू प्रश्न विचारलेला आहेस, तो हे सगळं सत्य आहे असं गृहित धरून विचारलेला आहेस. पण ही ज्ञानी माणसाची दृष्टी नाही. कारण त्याला संसाराविषयी सत्यत्व वाटत नाही. खऱ्या ज्ञानी माहात्म्याच्या बाबतीत व्यवहार आणि तत्वविमर्श हे एकत्र राहू शकत नाही. तत्वविमर्शाच्या वेळेला व्यवहार संपलेला आहे म्हणाले. व्यवहार खरा समजून तू प्रश्न केलेला आहेस. तुला ज्ञान होणार नाही. तुझ्या मनामध्ये व्यवहाराविषयी सत्यत्व बुद्धी जोपर्यंत आहे तोपर्यंत ज्ञान नाही. केवळ अध्ययनाने ज्ञान होत नाही. महात्मे जे आहेत, त्या माहात्म्यांना शरण गेल्याशिवाय त्यांची कृपादृष्टी झाल्याशिवाय ज्ञान नाहीये म्हणाले. तर या दृष्टीने उपरती शब्दाचा अर्थ, पूर्ण व्यवहार निवृत्ती. हा ही अर्थ गृहित आहे किंवा उपरती म्हणजे 'संन्यास' हाही अर्थ घेतलेला आहे त्यांनी. तर संन्यासाश्रम, याच्यामध्ये तीव्र विरक्ती हेही त्याचे एक अंग आहेच आहे. वैराग्य असल्याशिवाय संन्यास घ्यायचा नाहीये. तर तीव्र वैराग्य हे पूर्वांग शमसिद्धीला आणि दम समाधान वगैरे पुढची सगळी साधनं ही उत्तरांग म्हणून सांगितली. या सगळ्याही अंगांचा अभ्यास,

वैराग्याचा अभ्यास निरंतर चालू ठेवला पाहिजे. एखाद्या वेळेला आपण इंद्रियांचा संयम केला म्हणजे, 'संयम झाला' असं समजून उपयोग नाही. कोणत्याही स्थितीमध्ये संयम जाऊ देउ नये. अशी स्थिती यायची म्हणजे शेवटपर्यंत इंद्रिय निग्रहाचा अभ्यास पाहिजे. त्याचप्रमाणे वैराग्याचाही अभ्यास पाहिजे. त्याशिवाय वासनात्यागातच शम सिद्धी होऊ शकत नाही. आणि शम सिद्धी झाल्याशिवाय ईश्वरदर्शनही पूर्ण होणार नाही. सर्व वासनांची विरक्ती ज्या अंतःकरणातून झालेली आहे. अस शुद्ध जे अंतःकरण आहे, कोणचीही वासना त्याला राहिलेली नाही, त्या अंतःकरणामध्ये सच्चिदानंद परमात्म्याचं प्रतिबिंब प्रगट होत आहे. त्या अंतःकरणानीच आणखी परमात्मस्वरुपाचं ज्ञान होऊ शकतं. शुद्ध अंतःकरण असेल तर उत्तम ज्ञान होतं असाही एक पक्ष आहे. तेव्हा शब्दांनी ज्ञान होतं, असे दोन पक्ष मांडलेले आहेत. कारण इंद्रियांचं प्रत्यक्ष ज्ञान व्हायचंय. आत्मस्वरूपाचं ज्ञान प्रत्यक्ष झालं पाहिजे. त्याशिवाय प्रत्यक्ष संसार राहिल कसा ? अज्ञानाने अज्ञानाचं कार्य प्रत्यक्ष दिसतंच अस आम्ही समजतो तेव्हा प्रत्यक्ष ज्ञान झाल्याशिवाय विरक्ती होणार नाही. तेव्हा प्रत्यक्ष ज्ञानाचे साधन हे इंद्रिय आहे. अशी एक भावना आहे. तेव्हा शब्दांनी कसं प्रत्यक्ष ज्ञान होत ? शब्द हे सहकारी आहेत. इंद्रियांनी प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे मनाने ज्ञान व्हायला पाहिजे. शुद्ध बुद्धी झाली पाहिजे. एकाग्र बुद्धी झाली पाहिजे. पूर्ण वासनारहित बुद्धी झाली पाहिजे. भगवान योगेश्वर श्रीकृष्ण परमात्मा समोर येऊन उभे राहिलेले आहेत. भीष्म निर्वाणाची वेळ आहे. भीष्म अगदी शरशय्येवर निजून राहिलेले आहेत. केवढे विलक्षण धैर्य आहे, अंगामध्ये बाण रुतलेले आहेत आणि तशाही अवस्थेत पडून राहिलेले आहेत. श्रीकृष्णांनी आणखी धर्मराजाला सांगितलं, यांना विचारून घे आता ज्ञान संपणार आहे. जगामध्ये जे ज्ञान आहे ते यांच्याजवळ आहे. भीष्माचार्य पूर्ण ज्ञानी आहेत. जिज्ञासेला

अनुसरून सर्वही यांना तू विचार ते तुला सगळं समजावून सांगितील. भगवंतांनी आणखी कृपा केली. भीष्माचार्यांच्या व्यथा दूर झाल्या. त्यांच्या आज्ञेनी धर्मराजासारख्या माहात्मा, त्यांनी प्रश्न विचारले, आणि भीष्माचार्यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. शास्त्र हे ज्ञान करून देणारं आहे. शास्त्राने प्रत्यक्ष कार्य नाही, कृती नाही. कारक आहे. समजावून सांगणारं शास्त्र आहे. समजल्यानंतर करणं हे आपल्याकडे आहे. आपल्यावर अवलंबून आहे. त्याप्रमाणे धर्माचरण करावं अशी इच्छा धर्मराजांची होती. श्रीकृष्णांनी भीष्माचार्यांच्या ज्ञानाचं महत्त्व निवेदन केलं. त्यामुळे त्यांनी विचारलेलं महाभारताचं शांतीपर्व सर्वही भीष्माचार्यांच्या ज्ञानाचं आहे. किती ज्ञान आहे, विलक्षण सर्व ज्ञान आणखी सांगितलेलं आहे. उत्तरायण लागल्याबरोबर सर्व बंद केलं. उत्तरायण सुरू झाल्याबरोबर वाणी बंद केली, त्याचा तू विचार कर आणि आचरण कर असं त्यांना सांगितलं आणि अंतःकरणाची पूर्ण तयारी आहे. इतकं शब्दज्ञान आहे. श्रीकृष्णांनीसुद्धा त्यांच्या शब्दज्ञानाचं महत्त्व सांगितलं आहे. इतकं ज्ञान जवळ असूनही त्याचीही कधी पर्वा नाही. ते सोडून दिलय. वाङ्निरोध झालेला आहे. वाणी बंद केलेली आहे. शब्दज्ञान, त्या शब्दज्ञानाचा उपयोग म्हणजे, दुसऱ्याची संशयविरक्ती करणं याला होतो. "शाब्देपरेच निष्णात ।" ब्रह्मज्ञानी माहात्म्याच्या लक्षणामध्ये शाब्दनिष्णात हेही सांगितले आहे. कारण जर प्रश्न करणारा भेटला कुणी तर त्याच्या प्रश्नाचं समर्पक उत्तर देऊन समाधान करता आलं पाहिजे. तीही शक्ती पाहिजे. श्रवण, मनन, निदिध्यासन, साक्षात्कारापर्यंत जे पोचलेले आहेत त्यांना शाब्दनिष्णात होणं काही कठीण नाही. सर्वही आणखी ते करू शकतात. संशयनिवृत्ती व्हायची तर होईल. पण ती जबाबदारी आपल्यावर घ्यायची असं नाही. नरसोबाच्या वाडीला नारायण स्वामी महाराज म्हणून एक उत्तम दत्तभक्त होऊन गेले. काशीला जाऊन त्यांनी उत्तम अभ्यास केला. बारा वर्षं राहून आणखी

उत्तम बुद्धीमत्ता संपादन केली. समोर बृहस्पती जरी वादविवादाला आला तरी त्याला निरूत्तर करता आलं पाहिजे. ही वासना मनामध्ये राहिलेली आहे. त्यांना जे सद्गुरु भेटले ते संन्यासी महात्मे होते. त्यांच्याजवळ राहून वेदांचा अभ्यास झाला. श्रवण, मनन, निदिध्यासन सर्व प्रश्नं, उत्तरं, शंका, द्विरुक्ती सगळं झालेलं आहे. आणखी आता जायचं गावाला. गुरुमहाराजांनी विचार केला मनामध्ये की एवढा महात्मा चांगला सुखसंपन्न आहे, हा कुठं निघाला म्हणाले, वादविवाद करायचा, 'मी सगळ्यात बुद्धीमान आहे जगामध्ये,' असं दाखवायचं, काय करायची वासना ? निर्वासन अंतःकरण केलं पाहिजे. शिष्याचं खरं कल्याण करणारे हे गुरु होते. याठिकाणी 'गुरु' शब्दाचे दोन अर्थ ज्ञानराज करतात. मातापितरांच्या आज्ञेमध्ये होते. पित्याची आज्ञा मान्य करून, राज्यत्याग करून भगवान रामचंद्र प्रभु वनवासमध्ये गेले. ती आज्ञा पालन केली पाहिजे. त्यांची सेवा केली पाहिजे. हा एक अर्थ. आणि दुसराअर्थ, 'आणि संसारा ऐसा जाणून । जो भेटताची हरी शीण' असं म्हणतात. ही गुरू शब्दाची दुसरी व्याख्या आहे. 'संसारा ऐसा जाणून' म्हणाले. केवढा भोग आहे हा ! किती अनादी कालापासून चालत आलेला आहे आणि हा जायचा कसा ? तर सद्गुरूंची भेट झाल्यावर तो निघून जातो आहे. त्यांची सेवा करावी. भजन करावं, ईश्वरभावनेनी सद्गुरूंची सेवा करावी. तेव्हा या माहात्म्याला, जीवाला संसारातून बाहेर काढलं पाहिजे, असं नारायण शास्त्रीजी महाराजांच्या गुरूंनी ठरवलं आणि नदीवर रोज आंघोळीला जात होते. त्याप्रमाणे गेलेले आहेत.गुरूही गेलेले आहेत. शिष्य बरोबर आहेत. आणि छाट्या वगैरे घेतल्या गुरूमहाराजांच्या. पाणी कमंडलू घेतलं आणि निघाले.. गुरूमहाराजांनी विचारलं, ''काय शास्त्रीमहाराज ? तुमची सगळी इच्छा ज्ञानाची, विद्येची पूर्ण झाली की नाही ? कारण तुम्ही इथे विद्यापीठात येऊन राहिला. तुमच्या इच्छेप्रमाणे विद्या मिळाली ना ?''

''विद्येला अंत नाही, पण आपल्या कृपेने विद्या मिळाली,'' म्हणाले. मग गुरूदक्षिणा वगैरे द्यायला नको का म्हणाले. विद्या तुम्ही बारा वर्षे राहून घेतली म्हणजे गुरूदक्षिणा द्यायला पाहिजे . त्यांना वाटले आता हे काय मागतात. आपल्या सामर्थ्याने ! शक्तीप्रमाणे देइन'' म्हणाले ''धरा, पाणी हातात घेऊन सोडा,'' म्हणाले. ''गुरूदक्षिणा मी देतो.'' त्यांनी कबूल केलं आणि त्यांनी सांगितलं, ''शास्त्रीमहाराज आजपासून कोणाबरोबरही वादविवाद करायचा नाही. ही त्यागरूपी दक्षिणा मला तुम्ही द्या'' वादविवाद करायचा, आपण बुद्धीमान आहोत, आपण श्रेष्ठ आहेत. शाब्दज्ञान आपल्याला पुष्कळ आहे. शास्त्राचं ज्ञान आपल्याला पुष्कळ आहे. आपली कीर्ती झाली पाहिजे.'' या वासना मनामध्ये होत्या. त्या वासनाच बंद करून टाकल्या. गुरूदक्षिणा देतो म्हणून कबूल केलं. नाही म्हणता येईना. वाईट वाटलं. त्यांना उपदेश केलेला आहे.

''तुमचं भाग्य फार मोठं आहे म्हणाले. साक्षात् भगवान दत्तात्रेय तुम्हाला संन्यासदीक्षा देणार आहेत. उपदेश देणार आहेत. त्यांची सेवा करा नरसोबावाडीला जाऊन'' अस त्यांना सांगितलं आणि नंतर ते वाडीमध्ये राहिले. तर संशयनिवृत्ती करणं हे शाब्दज्ञानाचं मुख्य कार्य आहे. तेव्हा नारायण स्वामींना संन्यासदीक्षा झाली. प्रत्यक्ष नरसिंह सरस्वती दत्तात्रेयांनी त्यांना संन्यासाश्रम दिला आणि नरसोबा वाडी मध्ये ते त्यांच्या आज्ञेनं राहिले. अखंड ध्यानयोगाचा अभ्यास आहे. सगुण निर्गुण सगळ एकच मानताहेत. 'सगुण-निर्गुण एकच' हा सिद्धांत आहे. ज्ञानराजांचा. त्याप्रमाणे आणखी उपासना चालू आहे.

गावामध्ये एक कुष्ठरोग, महारोग झालेला मनुष्य गावाबाहेर झोपडी बांधून रहात होता. महाराजांची आपल्यावर कृपा व्हावी आणि आपण या प्रारब्धकर्मातून मुक्त व्हावं अशी इच्छा. एके दिवशी आणखी भगवान नरसिंह सरस्वती दत्तात्रेयांनी त्यांच्या स्वप्नामध्ये जाऊन सांगितल, ''या

ठिकाणी एक नारायणस्वामी महाराज म्हणून आहेत. रोज संगमावर सकाळी स्नान करण्याकरता ४ वाजता जातात. तेव्हा त्याठिकाणी तुम्ही जा. त्यांनी वर स्नान केल्यावर त्यांच्या अंगावरचं पाणी तुमच्या अंगावर पडू द्या. तुमचा रोग बरा होईल.'' त्याला आज्ञा झाली तो रात्रीच रस्त्यामध्ये जाऊन बसला. कोण स्वामी आहेत, काय आहेत माहित नव्हतं. ४ वाजता स्वामी महाराज निघाले. आणखी इथे नदीवरती प्रार्थना करून स्नानाकरता उतरणार तेवढ्यात खाली जाऊन उभा राहिलेला ब्राह्मण त्यांनी बघितला. त्यांच्या लक्षामध्ये सगळा प्रकार आला. देव सर्वज्ञ आहे. आणि भक्तही सर्वज्ञ आहे. त्यांच प्रेमही तसच आहे. नारायणस्वामी महाराज बाहेर आले.

तो मनुष्य आत उभा रहिला आहे. ''का बाबा तू इतक्या रात्री ४ वाजता कशाला आला आहेस स्नान करण्याकरता ? स्नान करून निघून जा.'' म्हणाले,

तो म्हणाला ''नाही, तुम्ही स्नान केल्यानंतर मला स्नान करायचं आहे.''

''हे तुला कोणी सांगितलं ?''

''मला दत्तात्रेयांची आज्ञा आहे. माझा रोग बरा व्हायचाय. त्यांनी आज्ञा केली तुमचं स्नान झाल्यावर खाली स्नान कर.''

''चल '' म्हणाले ''माझ्याबरोबर''

त्याला घेऊन. दत्तात्रेयांच्या समोर आले. खाली नदीमध्ये. अजून कोणी मंडळी उठली नव्हती. बाहेर उभे राहिले. त्याला सांगितलं, 'स्नान कर म्हणाले.' केल स्नान, वस्त्रं टाकून दे. दुसरी वस्त्र नेस. अंग सगळं एकदा पाहून घे.'' काही नाही. अंगाला रोग नाही. काही नाही. आणि ''आत्ताच्या आत्ता या गावातून निघून जा'' म्हणाले. ''सूर्योदय होईपर्यंत

तू या गावात राहशिल तर तुझं शरीर पुन्हा पूर्वीप्रमाणे होईल.'' कारण हा सांगत हिंडणार सगळ्यांना, मला नारायणस्वामींनी अमुक केलं, बरं केलं, घालवून दिलं. वर जाऊन दंडाला स्पर्शमुद्रा बांधली आणि खाली आले. अजून कोणी उठलेलं नाही. गावाला जायचा वेळेला ही स्पर्शमुद्रा बांधतात.

आतून आवाज आला, ''काय स्वामीमहाराज ? कुठ प्रवास आहे आता ? गावाला निघाला ?''

तुम्हाला आमचा कंटाळा आलेला दिसतोय !''

स्वामीमहाराज आले बाहेर. दत्तात्रेय नरसिंहसरस्वती म्हणाले, ''तुमचा कंटाळा ?'' दंड धरला, ''थांबा'' म्हणाले. तुमचा कंटाळा आला म्हणून कोणी सांगितलं ?

''मग हे कोणी केलं ? त्या ब्राह्मणाच्या स्वप्नात जाऊन त्याला माझ्याखाली स्नान करायला सांगितलं ? तो ब्राह्मण तुमच्यासमोर स्नान करून बरा होऊन गेला. तेव्हा ही उपाधी आपण मला लावत असाल तर आपल्या सान्निध्यात येऊन काय करायचंय ? प्रारब्धकर्म हा आमचा दोष आहे. जीवाचा दोष आहे. परंतु तो दोष. ''तद्दोष आदर्श स्वरूपं सर्वभूतानां ।' आपण आहात ना ! भक्तांचे दोष पहायचे नाहीत. मग प्रारब्ध आहे. प्रारब्धाप्रमाणे आहे असे समजून तुम्ही जर वागू लागलात ना !'' स्वामी महाराज म्हणाले. ''अहो तुमच्यासारख्या ज्ञानी माणसाचं जगाकडे लक्ष नको का ? जगाचा उद्धार कसा व्हायचा ?''

त्यांनीही उत्तर दिले, ''जग ज्यांनी निर्माण केलं त्याचं काम आहे ते. आमचं काम नाहीये. आम्ही आपलं फक्त ध्यान करीत राहणार. आपली उपासना करणार, चिंतन करीत राहणार.'' हे उत्तर त्यांनी दिलेलं आहे. त्यावेळी महाराज म्हणाले, 'जा आता. तुम्ही, लवकर स्नान करा. आम्ही तुमच्या वाटेला जाणार नाही.' आणि असं म्हणून ते भांडण

मिटलं." 'देवभक्ताचे भांडण । पराभक्तीचं ठाण ।'

हे पराभक्तीचं म्हणून उदाहरण दिलेलं आहे. तेव्हा शाब्दज्ञान हे पूर्ण जरी असलं तरी त्या पूर्ण ज्ञानाचं फल लोकांचा उद्धार करणं, संशय दूर करणं. प्रवचन वगैरे करणं हा मुख्य उद्देश नाहीये. परमात्मा सगळं करणारा समर्थ आहे. अर्जुनाला आणखी अहंकार झाला होता, "मी विचार करू शकतो," हा अहंकार झाला. आणि त्यामुळे आरंभाला मी हे करणार नाही. युद्ध करणार नाही. पाप लागणार आहे. अमुक लागणार आहे. सगळा निर्णय आपला करून टाकला त्यांनी. भगवान स्वस्थ होते. शेवटी त्यालाच आणखी आपला अहंकार झाला असं वाटलं. आणि "मी आपल्याला शरण आलो आहे" हा अहंकार जेव्हा टाकून दिला अर्जुनाने त्यावेळी भगवद्‌गीतेतल्या उपदेशाला सुरुवात झालेली आहे. धर्मस्थापना कशी करायची, काय करायची, निमित्त काय करायचं हे सगळं ठरलेलं आहे. परमात्म्याची इच्छाशक्ती एवढी मोठी आहे, नियामक ईश्वरशक्ती. अर्जुन पाहिजे होता असं नाही. पण अर्जुनाचंही कल्याण करायचं होतं. म्हणून त्याला निमित्त करून, गीताशास्त्राचा उपदेश भगवंतांनी केला. त्याचप्रमाणे आणखी भीष्माचार्यांना संपूर्णपणे शाब्दज्ञान होतं. ते पुढं म्हणाले. काही मनामध्ये आसक्ती नाही. आणखी याप्रमाणे भगवंताचं ध्यान करतायत. समोर भगवान, पीतांबरधारी उभे आहेत. आणि त्यांचं ध्यानं चाललेलं आहे. आपलं शरीर विसर्जन करायचं आहे आता. इच्छामरणी ते होते, पित्याच्या वरप्रदानामुळं ! त्याप्रमाणे आणखी आता हे शरीर ठेवायचं नाही. असं त्यांनी आरंभाला आणखी म्हटलेलं आहे. ही माझी बुद्धी मी आपल्याला अर्पण केलेली आहे. 'वितृष्णामतिः' मुख्य आहे. कोणचीही वासना या बुद्धीमध्ये शिल्लक राहिलेली नाही. लक्ष द्यायचं तर आपल्या बुद्धीकडे, आपल्या इंद्रियांचा संयम, निग्रह याकडे लक्ष दिलं पाहिजे. मनानेच सगळं करायचंय. परमार्थही मनानेच होणार, संसारही

मनानेच होणार. त्या मनाचं आणखी पूर्ण लक्ष आहे. मनानी पहायचं, विचार करायचा म्हणजे किती वासना शिल्लक आहेत. किती गेलेल्या आहेत, किती राहिलेल्या आहेत. स्वतःच्या बुद्धीचं परीक्षण, स्वतःच्या बुद्धीनंच केलेलं आहे. ''सर्व साक्षीमस्तुं ज्ञानतयाज्ञानतयावा ।'' परंतु बुद्धीमध्ये असलेले गुणदोषसुद्धा, साक्षीच्या सान्निध्यामध्ये असणारी बुद्धी, त्या बुद्धीनेच पहायचे आसतात. त्या बुद्धीने आपल्या बुद्धीचं निरीक्षण करणारे भीष्माचार्य सांगतात, '' माझी बुद्धी वितृष्ण आहे. काहीही तृष्णा नाहीये. वासना नाहीये. सर्व मी आपल्याला अर्पण केलेलं आहे'' ईश्वर स्वरुपाचं चिंतन दोन्ही प्रकारांनी असलं पाहिजे. देशकाल मर्यादा याला नाहीत. देशपरिच्छेद, कालपरिच्छेद, वस्तुपरिच्छेद याला नाही. अशा प्रकारचा असा आणखी एकमेवाद्वितीय परमात्मा त्याला ही बुद्धी आर्पण केली. हा एक अर्थ. अथवा निजानंदामध्ये निमग्न असणारा तो परमात्मा. हे सांगतात म्हणाले भीष्माचार्य. ज्या वेळेला बहुरूप आपण व्हावं अशी इच्छा झाली. संकल्प झाला. कृपा करावी अशी इच्छा झाल्याबरोबर त्या प्रकृतीचा संबंध आला. त्या प्रकृती संबंधामुळे अनंत ब्रह्मांडाची निर्मिती झाली म्हणजे सगुणही परमात्मा तोच आहे आणि निर्गुणही तोच आहे. हा सिद्धान्त भीष्माचार्यांनी इथे दाखवलेला आहे. ''तुज सगुण म्हणू की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ।'' ज्ञानराजांनीही हाच सिद्धांत मांडलेला आहे. तेव्हा त्याप्रमाणे आणखी शमसिद्धी पूर्ण झाल्यानंतर त्यात संन्यासही आलेला आहे. पूर्ण वैराग्य निर्वासन अंतःकरण अधिकाधिक झालेलं आहे. आणि अशा रीतीने संन्यासाश्रम घेतल्यानंतर हे करायच आहे श्रवण आहे. मनन आहे. निदिध्यासन आहे. त्याच्यामध्ये सगुणाचंही श्रवण करायला हरकत नाही. शुकाचार्य महाराज, सबंध भागवताचा अभ्यास त्यांनी केला. पूर्ण ब्रह्मज्ञानी होत. स्त्री, पुरुष हा भेद सुद्धा त्यांच्या बुद्धीमध्ये राहिलेला नाही. अशी ज्यांची योग्यता आहे, सर्वत्र ब्रह्मात्म भाव झालेला परंतु सगुण परमात्म्याच्या कथा ऐकणं, सांगणं,


अधिकारी महात्म्याला सांगून त्याचा उद्धार करणं. हे त्यांनाही आणखी आवडत होतं. त्याप्रमाणे भगवंताची उपासना, श्रवण, मनन, निदिध्यासन, सगुणाचं श्रवण, मनन, निर्गुणाच श्रवण, मनन हे सगळं श्रवण करून बुद्धीमध्ये असलेले दोष सगळे दूर झालेले आहेत. आणखी समाधी अवस्थेपर्यंत ज्यांची बुद्धी गेलेली आहे. आणखी समाधी अवस्था प्राप्त झाल्यानंतर मग आत्मसाक्षात्कार सांगितला आहे. तेव्हा ही योग्यता संन्यासी महात्म्याशिवाय नाही आहे. संन्यासाचा आग्रह आचार्य महाराज करत असतात. गीताभाष्य लिहिताना आणि गीतेचा खरा अर्थ काय आहे. लोकांना कळावा, भ्रांती होऊ नये या करता हे विवेचन केलेले आहे, त्याप्रमाणे त्यांनी पूर्ण संन्यास, खरा संन्यास धारण केलेला आहे. " हे संन्यासी महात्मे, " आचार्य महाराज हे मुद्दाम सांगतात, "खरे भाग्यवान ते आहेत कुठंही झाडाखाली रहाणारे आहेत. काही त्यात नाही. मोठं घर पाहिजे, अमुक पाहिजे, काही नाही. कुठही झाडाखाली रहाणारे आणि संग्रहात काहीच नाही."

इथे अहं बुद्धी काही नको आहे. सर्व वासनांची समाप्ती झालेली आहे. अशा प्रकारचे महात्मे पूर्ण वैराग्य त्यांच्या जोडीला आहे. भगवंताची पूर्ण कृपा आहे. त्यामुळे प्रारब्धाची आडकाठी येऊ शकत नाही. संन्यास धारण केल्यानंतर भगवान गोपालकृष्णांनी जो उपदेश केला उद्धवजींना, त्यात संन्यासी पुरुषांनी पृथ्वीवर नेहमी फिरत राहिलं पाहिजे म्हणतात. "ग्रामैकरात्रं विजना निरपेक्ष स्थलमहीम्" म्हणतात. कोणच्याही गावामध्ये एका रात्रीशिवाय मुक्काम करायचा नाही. ज्याचं प्रारब्ध असेल ते ते आपोआप इथे राहतात. विचारतात. सद्बुद्धीने विचारल्यानंतर त्यांना सन्मार्गदर्शन करायचं. ज्याप्रमाणे श्रद्धा असेल त्याप्रमाणे आचरण केलं तर सर्वही समाजाचं कल्याण करण्याकरता सर्वत्र प्रवास केला पाहिजे. हे संन्याशाला मुद्दाम सांगितलं आहे. पण जास्ती कुठं थांबायचं नाही.

कुणाच्याही घरात म्हणा, मंदिरात म्हणा, एक रात्र रहायचं, स्वमी दुसऱ्या दिवशी गेले दुसरीकडे, कुठं राहिले, कुठे गेले काही पत्ता नाही, असं वागणं असलं पाहिजे. पण त्या योगाने आणखी अनेक लोकांना सन्मार्गदर्शन घडत असतं. जिज्ञासू मंडळीही असतात ना ! सगळ्यांच्या जवळ रजोगुण तमोगुण जास्त असतात असे नाही. सत्वगुण मिळवलेले, असेही लोक असतात. अनेक जन्म गेलेले आहेत, ईश्वराची उपासना झालेली आहे. कर्मानुष्ठानं केलेली आहेत संतमहात्म्यांची कृपा झालेली आहे. त्यामुळे सत्वाधिक असं मन झालेलं आहे. त्यामुळे असे महात्मे थोडावेळ का होईना एकदा भेटले, त्यानी मार्गदर्शन केलं तरी लगेच त्यांना बोध होतो. आचरण करून ते मुक्त होतात. म्हणजे संन्यास म्हणजे सर्वांना उपकारक आश्रम आहे. गृहस्थाश्रम उपकारक म्हणून कालीदासांनी वर्णन केलेला आहे. परंतु खरा उपकारक म्हणजे संन्यासाश्रम आहे. पूर्ण योग्यता आणखी मनाची, इंद्रियांची, संयमाने निर्माण करून, मनातल्या सगळ्याही वासना घालवून भगवंताची उपासना अखंड चालू आहे. आणि समाधी सिद्धी ईश्वर प्रसादाने प्राप्त करून देऊन आणि सर्व लोकांचा उद्धार करताहेत. तेच आचार्य महाराजांनी साधन पंचकाच्या शेवटी सांगितलं आहे. ''एकान्ते सुखमाह्यताम्'' एकान्तामध्ये आणखी आसनावर बसावं, मनामध्ये काही वासना नाहीत. संन्यासीमहात्म्याने ''परपरे चेतस् समाधियताम् ।'' सच्चिदानंद परमात्म्याच्या ठिकाणी अंतःकरण स्थिर करायचं. मन हे दृश्यापेक्षा बाहेर जाऊ शकत नाही. मूर्तपदार्थ जगामध्ये आहेत. अमूर्त पदार्थ जगामध्ये नाहीत. अशी आपल्या मनाची कल्पना झालेली आहे. पण अमूर्त अशा प्रकारचं हे अव्यक्त स्वरूप आहे. हे शब्दांनी, शब्दशास्त्रज्ञ जे महात्मे आहेत, यांच्या वाक्यावरून समजून घेऊन श्रद्धेने त्याचं ध्यान करावं. निदिध्यासनापर्यंत आलेले आहेत. श्रवण झालं, मनन झालं, निदिध्यासन सांगतात आचार्य महाराज ''परपरे

चेतस् समाधियताम् ।'' आणि त्या निदिध्यासनाच्या योगाने समाधीसिद्धी झाली. म्हणजे पूर्ण आत्मा जो आहे सच्चिदानंद परमात्मा त्याचा आणखी साक्षात्कार करून घ्यावा. आणखी त्या आत्मज्ञानाच्या बलाने पूर्ण आत्मदर्शन झालं. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर आणखी ''जगत् इदं तद्बाधिकं दृश्यताम् ।'' शेवटी संपूर्ण जग हे बाधित आहे. नाश नाही, समाधी सिद्धीने. जगाचा नाश नाही. असाही एक सिद्धान्त आहे. शास्त्रकार मानतात. सारखा जगाचा प्रवाह नित्य मानणारे लोक आहेत. परंतु जगाचा नाश होतो. तर हे ज्ञान ''वासुदेवः सर्वं'' ज्ञान झाल्यानंतर होतं. सबंध जग संपलेलं आहे. जगाचा पात झाला अज्ञानही गेलं, पुढची व्यवस्था सांगतात आचार्य महाराज. पूर्वी झालेली कर्म अनंत जन्मामध्ये झालेली आहेत ही सगळी संपून जातील. पूर्वी केलेल्या कर्माचा आणखी नाश होतो. आणि आत्ता क्रियेने जे कर्म चालू असेल त्याला जीवन्मुक्ती दशा दाखवली महाराजांनी. जीवनमुक्तीमध्ये ब्रह्मसाक्षात्कार झालेला आहे. ब्रह्मसाक्षात्काराने पूर्वीची संचित कर्मं नष्ट झालेली आहेत. क्रियमाण कर्माचा संबंध नाही. निर्वासन अंतःकरण, भगवत्परायण अंतःकरण झालेलं आहे. साक्षात्कार झालेला आहे. त्या अंतःकरणाला त्या ठिकाणी कर्माचा संबंध असू शकेल का ? म्हणून प्रारब्धाचा मात्र भोग घ्यायचा आहे. मुक्तेषु प्रमाणे ते सुटलेले आहे. बाण सुटलेला आहे. वेग असेपर्यंत राहील. पडेल. त्याप्रमाणे ''प्रारब्धयोगयोः परब्रह्मात्मना स्थीयताम् ।'' ही देहमुक्तीची अवस्था ही संन्यासी महात्म्यांकरता सांगितली आहे, खरा अधिकारी संन्यासी आहे. गृहस्थाश्रमी माणसानी वेदान्त ऐकायचा नाही असं नाही. पापक्षय होईल. चांगले आणखी वेदान्ताचे विषय श्रद्धेने ऐकले तर पापक्षय होतो. पण वासनाक्षय होत नाही ना । वासना मनामध्ये जास्ती जास्ती वाढतात. पूर्व संचित पुष्कळ आहे. क्रियमाण कर्माचा संबंध आणि वासना जास्ती जास्ती वाढतात. अशा स्थितीमध्ये

वासनाक्षय कसा होणार ? म्हणून वासनाक्षयाचा अभ्यास श्रवण, मनन, निदिध्यासनाने ज्यांनी केलेला आहे, असे संन्यासी महात्मे वैराग्यसंपन्न असणार आहेत. ब्रह्मलोक सुद्धा नको काही नको, राजसूय यज्ञ ब्रह्मलोक मिळण्याकरिता म्हणून धर्मराजांनी केला, सांगतात. पुनरावृत्ती नाही. हा फायदा असेल. तिथे ब्रह्मदेव असेपर्यंत थांबा म्हणाले. लगेच मुक्ती नाहीये. तर त्या दृष्टीने ब्रह्मदेवसुद्धा आम्हाला नको, काही नको इतकी वैराग्य भावना, इतकी निर्वासनावस्था मनाची संपादन करणारे महात्मे शेवटी जीवनमुक्त स्थितीतूनही देहमुक्त होतात. कर्म संपल्याशिवाय जन्म थांबणार नाहीये. तेव्हा जन्म नको असेल तर कर्म संपली पाहिजेत, तीच कर्म संपण्याकरता कर्मयोग आहे. ध्यानयोग आहे. भक्तीयोग आहे. अष्टांगयोग आहे. हे सगळे उपाय शास्त्रकारांनी सांगितले आहेत. संत महात्म्यांनी आणि ज्ञानराजांनीही त्याला स्पष्टीकरण उत्तमप्रकारे करून ठेवलेलं आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी आजपासून आणि एका संन्यासी महात्म्याचा पुण्यतिथी उत्सव सुरू झालेला आहे. शताब्दी उत्सव, पवित्र क्षेत्रामध्ये त्यांचं वास्तव्य झालेलं आहे, त्यांनी आणि श्रवण, मनन, करून आपली कृतार्थता मिळवलेली आहे. अशा प्रकारच्या संन्याशाच्या दर्शनाने पावित्र्य उत्पन्न होते. भिक्षु म्हणजे संन्याश्याचं नुसतं दर्शन जरी झालं तरी पापक्षय होतो. समुद्राचं दर्शन झालं तरी पापक्षय होतो. त्याप्रमाणे आणखी संन्यासी महात्मे पाहिल्याबरोबर पापक्षय करणारे असतात. आत्मचिंतनामध्ये अखंड निमग्न असतात. पूर्ण वासनाक्षय करण्याचा प्रयत्न त्यांचा चाललेला आहे. वासनाक्षय झालेला आहे. आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेऊन कृतार्थ झालेले आहेत आणि जगाला सन्मार्गदर्शन करणं एवढच त्यांचं कार्य आहे. तेव्हा अशा रीतीनं या उत्सवाच्या निमित्ताने काही थोडीशी वाङ्मय सेवा घडण्याचा योग आला आणि ह्या सर्वही मंडळींचं निरंतर चिंतन, मनन, श्रवण निदिध्यासन अखंड चाललेलं आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी



ग्रंथ करून ठेवलेला आहे. पण त्याचा शेवट ''एक तरी ओवी अनुभवावी'' इथे आहे. इथपर्यंत पोहोचलं पाहिजे. पण आपलं मन तिथपर्यंत जात नाही. अनुभवात्मक ज्ञान पाहिजे तरी सुद्धा अहंकार चित्तामध्ये न रहाता, श्रद्धेनं आणखी पूर्ण मुमुक्षा धारण करायला हवी. चिंतन करायला हवं. परस्पर चिंतन मननाचे दोन प्रकार सांगितले आहेत. परस्पर एकट्याने मनन करणं, किंवा बरोबरीची जी मंडळ आसतील. सहाध्यायी म्हणा, गुरू म्हणा यांच्याबरोबर विचार करणं हे ही मनन आहे. आता तसं मनन प्रत्यक्ष ज्ञानराजांच्या बरोबर करण्याचं भाग्य आपलं नाहीये. ''सच्चिदांनद बाबा आदरे लेखकु जाहला ।'' त्यांनी कृतज्ञता शेवटी लिहून ठेवली. त्यांनी लिहून ठेवलं म्हणून आपल्याला मिळाल तरी पहायला. नाही तर कस मिळणार? त्यांचे ग्रंथ आपल्यासमोर आहेत. त्यांच स्थान या टिकाणी आहे. त्या स्थानाचही विशेष महत्त्व आहे. तशा स्थानामध्ये जाऊन श्रद्धेन त्या ग्रंथाचं आणखी चिंतन करायला सुरुवात केल्यानंतर आणि त्यांच्याच प्रेरणेने बुद्धीमध्ये ''एक तरी ओवी अनुभवावी'' ही वेळ येणार नाही अस होणार नाही. परंतु आस्था पाहिजे. श्रद्धा पहिजे. आपल्या सर्वांच्या अंतःकरणामध्ये अशा प्रकारची श्रद्धाभक्ती आहे. आणि आपल्याला ही सेवा निरंतर घडतेच आहे. हा उत्सवाचा योग आलेला आहे. याचाही आणखी आपण फायदा घेऊन आपली कृतार्थता, आपला मनुष्य जन्म कृतार्थ व्हावा, याकरता प्रयत्न करायचाय. संग आपला राहू नये. निःसंग, असंग अंतःकरण झालं पाहिजे. भीष्माचार्यांच्याप्रमाणे संसारात राहून आणखी असंग अंतःकरण आहे. हे किती मोठं कठीण आहे. तर अशा रितीनं

**''ऐसा कर्तृत्वाचा मदु । आणि कर्मफलाचा आस्वादु ।''**
**या दोहोचेही नाव बंधु ।कर्माचा ॥**

स्पष्ट सगळं सांगितलं आहे. कर्तृत्व अहंकार. मी कर्म करतो आहे. मी अमुक ज्ञान मिळवलेलं आहे. मी प्रवचन करतो आहे. मी अमुक करतो आहे याचा उपयोग नाही. आणि या कर्माचे फल मला मिळलं पाहिजे अशी कर्मफलाभिलाषा असणार. हाच बंध आहे म्हणतात ज्ञानराज. ते दोन्ही बंध आमचे गेल्याशिवाय अनुभव कसा यायचा ओवीचा ? खरा अर्थ ज्ञानराजांच्या ओवीचा समजणार कसा ? नामदेव महाराजांनी सांगून ठेवलेलं आहे, ''अनुभव घ्या.'' तसा अनुभव त्यांना मिळालेला आहे. ते मोठे उपासक होते. भक्त होते. तर अशा दृष्टीने ज्ञानेश्वर महाराजांच्या कृपेने, सर्वांची बुद्धी अशी निर्वासन होत होत, क्रमान अधिकारी बनावी. आणि अशा अधिकारी बुद्धीमध्ये आत्मसाक्षात्काराची योग्यता प्राप्त व्हावी. आणखी सर्वांचं कल्याण व्हावं एवढीच प्रार्थना करून आजची ही सेवा त्यांना निवेदन करून पुढे जाऊ या.

**पुंडलिक वरदा हरी विठ्ठल ।**
**श्री ज्ञानदेव तुकाराम ।।**

# "अनुग्रह"

**अहं सर्वस्य प्रभवः मत्तः सर्वं प्रवर्तते ।**

भगवद्गीतेमध्ये भगवान गीतेचा उपदेश अर्जुनाला करताहेत. त्यावेळेला आपण कोण आहेत हे त्यांनी सांगितलेलं आहे. "सर्व विश्वाला उत्पन्न करणारा मी आहे आणि सर्वही कार्यं माझ्यापासून प्रवृत्त होतात. सर्वांचा प्रवर्तक मी आहे," हे स्वतः भगवान सांगतायत. जीवाच्या करता सांगतायत. जीवाची बुद्धी अशी असली पाहिजे की कोणीतरी एक कर्ता, पूर्ण शक्तीसंपन्न असा आहे ही भावना जीवाच्या अंतःकरणामध्ये उत्पन्न व्हायला हवी म्हणून हे सांगितलं. त्यात काही स्वतःच्या शक्तीचा अभिमान नाही. वस्तुस्थिती आहे. तर ही जी ईश्वरशक्ती ईश्वराने प्रगट केलेली आहे. अधिकारी व्यक्तीला उपदेश करीत असताना, त्या शक्तीचं स्वरूप काय आहे ? 'ईश्वरशक्ती सर्व प्रवर्तक आहे' अस ईश्वरानेच सांगितलेलं आहे. ईश्वररूप होणारे महात्मे हे अर्थात ईश्वररूप असल्याने त्यांची शक्ती म्हणजे ईश्वरशक्तीच आहे.

'ज्ञानीत्मात्मेव मेमतं। म्हणून महाराज सांगतात ज्ञानी आणि माझ्यामध्ये काही फरक रहात नाही. भेदबुद्धीं ही देहदृष्टीनी आहे. हा निराळा, तो निराळा, उपाधिक भेद आहे. वस्तुतः निरूपाधिक स्वरूपामध्ये भेद नाही आहे.

**साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।**
**अवघे मिळूनि एकचि जाहले । देहातीत वस्तू ।।**

समर्थांचा सिद्धान्त आहे. सर्वही ब्रह्मज्ञानी महात्मे एकरूप आहेत. देहातीत, वस्तुरूप झालेले आहेत. अर्थात त्यांचाही संकल्प म्हणजे ईश्वरसंकल्पच आहे. संकल्पशक्ती ही व्यवहारातही आपण मानतो. अनेक प्रकारच्या शक्ती आहेत.

अनुभवापर्यंत तत्त्वज्ञान झालं पाहिजे. शब्दाने तत्त्वज्ञान होतं, नाही असं नाही. शब्दप्रमाण त्याकरताच आहे. तत्व, अतत्व विचार करण्याकरता शब्दप्रमाण आहे. बुद्धीही त्याला अनुरूप असावी एवढच शास्त्रज्ञांचं सांगणं आहे, आचार्य महाराज सांगतायत. बुद्धी प्रमाण आहे. सर्व शास्त्रज्ञांनी, सर्व महर्षींनी, बुद्धी प्रमाण मानलेली आहे. परंतु ती शास्त्रप्रमाणानुसारी असावी. संस्कृत असावी असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ बुद्धीने पूर्ण निर्णय करता येत नाही. पूर्ण बुद्धीचे महात्मे म्हणजे साक्षात् ईश्वररूपच झालेले असतात. तेव्हा, ज्या जीवात्म्याची अभ्यास करता करता बुद्धी अत्यंत स्थिर झाली, आत्मस्वरूपाकार झाली, आत्मभाव ज्या बुद्धीमध्ये बाणलेला आहे, अशा महात्म्याचा जो संकल्प आहे, त्यांची दृष्टीसुद्धा इतकी शक्तीसंपन्न असते की ती ज्याच्यावर पडेल त्याचा सर्वही पापक्षय होतो. सत्पुरुष किंवा ज्ञानी महात्मा, याला मोक्ष कसा मिळतो - हा एक विचार उपनिषदामध्ये आलेला आहे. ज्ञानीमहात्म्यांना या जन्मामध्ये ज्ञान झालं असेल तरी त्यांनी मागच्या अनेक जन्मामध्ये पुष्कळ कर्मं केलेली आहेत. मुक्त होणं याचा अर्थ कर्म संपणं. म्हणजे मुक्त होणं. तर ती सगळी कर्म संपल्यानंतर देहसंबंध संपला. जन्म मृत्यूची व्याख्या शास्त्रकार करतात.जन्ममृत्यूचं म्हणजे नवीन देहाच्या संबंधाचं, कारण काय ? तर त्याने केलेली जी कर्म आहेत त्या कर्मामुळे देह संबंध

येतो. अनेक देह आहेत. त्या त्या देहाचा संबंध त्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे येतो. हा एक सिद्धान्त त्यांनी मांडला. ती कर्म संपली, म्हणजे, कारणच नाहीसं झाल्यानंतर, देहरूपी कार्य होणारच नाही. अर्थात देह संबंध संपला. देहसंबंध असेपर्यंत सुखदुःख द्वंद्वाची जाणीव राहणार. ती ही संपली, देहाचा संबंध संपल्यामुळे. हे ही मुक्त पुरुषांचं स्वरूप आहे. देहसंबंधाला संपूर्ण देहाला कारण असलेली सर्व कर्म संपून जाणं. ही सर्व कर्म कशी संपणार, हा एक मोठा प्रश्न आहे. तर त्याचं मुख्य साधन म्हणजे, आत्मज्ञान जे आहे. परमात्मस्वरूपाचं प्रत्यक्ष ज्ञान, नुसतं शाब्दज्ञान नाही, प्रत्यक्ष ज्ञान हे सर्व कर्मक्षयाला कारण आहे.

सर्व कर्माचा नाश ज्ञानाग्नीने होतो असे सांगतात भगवान. जर ती सर्वही कर्मं संपवायची असतील तर त्याला त्याकरता आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावं लागतं. ते आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याकरता साधन म्हणजे बुद्धीची स्थिरता पाहिजे. बुद्धीची जरूरी ही व्यवहाराकरिता जशी सांगितली जाते, त्याचप्रमाणे मोक्षाकरता सुद्धा बुद्धीची जरूरी आहे. संसार, अपवर्ग म्हणजे, 'मोक्ष,' दोघांनाही बुद्धीची जरूरी आहे. परमार्थामध्येही बुद्धी पाहिजे आणि व्यवहारामध्येही बुद्धी पाहिजे. म्हणून बुद्धीला जास्ती श्रेष्ठत्व सर्वांच्या मताने आहे. बुद्धीवाद म्हणजे. बुद्धीप्रधान वाद तो सर्वशास्त्रांकरता मान्य आहे.

धीमान् जो आहे खरा त्याला कोणताही जगामध्ये अविषय नाही. सगळ्या विषयाचं ज्ञान तो संपादन करू शकतो. ते बुद्धीचं महत्व कालीदासांनीही सांगितलं आहे. त्या बुद्धीमध्ये, चांचल्य म्हणून दोष आहे. चांचल्यापुढे अर्जुनासारख्याला पण हात टेकावे लागले, की माझे मन मी आवरू शकत नाही. केवढी अस्त्र विद्या संपादन केलेली होती अर्जुनाने. शंकराची कृपा झाली. सर्व देवांची कृपा झाली. सर्व देवतांच्यापासून,

शंकरांच्यापासून उत्तम विद्या त्याला मिळाल्या होत्या. संगीतविद्यासुद्धा अर्जुन शिकला. त्याला इंद्राने मुद्दाम सांगितलं, तू शिकून घे. समर्थांनी जे श्रवणभक्तीचं निरूपण करताना सांगितलेलं आहे - 'ऐकत जावे।' किती वर्णन केलेलं आहे समर्थांनी. म्हणजे वैराग्य पाहिजे, त्याग केला पाहिजे. पण ज्या काही आवश्यक गोष्टी आहेत पूर्वभूमिकेमध्ये, ज्ञानाच्या पूर्वी, त्यांच्या संबंधी वैराग्य उपयोगी नाही. हे समर्थांचे फार महत्त्वाचे सांगणं आहे. किती शास्त्रं आहेत, किती विषय आहेत. त्याप्रमाणे अर्जुनाला सगळी विद्या आहे. संगीतविद्या आहे., अस्त्रविद्या आहे, ईश्वराबद्दल अत्यंत श्रद्धा आहे. भक्ती आहे, गुरूभक्ती आहे, गुरुकृपा आहे, सगळं आहे. अशा अवस्थेमध्ये असणारा अर्जुन -

**"चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्" ॥६:३३॥**

मनाचा निग्रह फार कठीण आहे. हे अर्जुनाचे उद्गार आहेत. हे मान्य आहे. भगवान म्हणाले "हे खरं आहे. मन हे निग्रह करण्याला फार कठीण आहे" म्हणाले. पण निग्रह करता येणार नाही अस नाही. भारतीय संस्कृतीमध्ये आशावाद फार आहे. अनेक प्रकारची साधनं सांगितलेली आहेत. त्या निरनिराळ्या साधनांचा अभ्यास करून आणखी आपल्या मनाची, बुद्धीची स्थिरता ही संपादन करणं हे मुख्य सांगितलेलं आहे. बुद्धीस्थैर्य हे आत्मज्ञानाला अत्यंत उपयोगी आहे.

"अभ्यास वैराग्याभ्यां तन्निरोधः ।" आणि भगवानसुद्धा "अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते।" तीच साधनं त्यांनी सांगितलेली आहेत. तर, मनाला स्थिर करण्याचे दोन उपाय योगशास्त्रकारांनी सांगितलेले भगवंतांनी सांगितले. अभ्यास करणं. मन स्थिर करण्याचा प्रयत्न

**'यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम्।**
**ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ।।६:२६।।गीता।।**

स्वरूपानुसंधान व्हायला पाहिजे. आत्मस्वरूप खर काय आहे ते शास्त्रांनी, आचार्यांनी जसं सांगितलं असेल ते मनामध्ये आणून त्याचं अनुसंधान त्या बुद्धीने, मनाने जर झालं तर पुढे साक्षात्कार होतो. समाधी आहे. आत्मसाक्षात्कार झाल्यानंतर सर्व संपलं. सर्व कर्मक्षय होतो. सर्व कर्मक्षय झाल्यानंतर सुखदुःखादिक संवेदना बंद होतात. ही स्थितप्रज्ञाची लक्षणं त्याकरताच सांगितलेली आहेत. आचार्यांनी स्थितप्रज्ञाची लक्षणं वितरण करीत असताना सांगितलेलं आहे, की ही लक्षणं ज्ञानी मनुष्याला नैसर्गिक असतात. ज्ञानाभ्यास करून त्या भूमिकेवर गेलेल्याला प्रयत्न काही करावे लागत नाहीत.

"दुःखेषु अनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।" हे मात्र आमच्या सारख्या संसारी, अज्ञानी मनुष्याला फार अशक्य वाटतं. प्रयत्न करावा लागतो. त्याला काही नाही, नैसर्गिक आहे. त्यांची ही नैसर्गिक लक्षणं आहेत. साधकांची सगळी ही साधनं आहेत म्हणून सांगतात, भगवद्गीतेमध्ये हे सांगितलेलं आहे. त्याचप्रमाणे "अद्वेष्टा सर्व भूतानां मैत्रः करुण एव च ।" ही भगद्भक्ताची लक्षणं आहेत. सगळी साधकांची साधनं आहेत. बुद्धी स्थिर व्हावी, आत्मस्वरूपाचं अनुसंधान करता यावं. बुद्धी स्थिर झाल्याशिवाय आणि आत्मस्वरूपानुसंधान होणार नाही. त्या मनाची, बुद्धीची स्थिरता हे प्रमुख साधन मानलेले आहे. तर स्वरूपानुसंधान, ज्ञान, यांना मोक्षाचं साधन मानलेलं आहे. योगाभ्यास त्या करता आहे. प्राणायामादिक अभ्यास पण फार कठीण आहे. साधन सांगता सांगता एक साधन त्यांनी असे सांगितलेलं आहे.

"वीतराग विषयं वा चित्तम् ।" हे एक योगसूत्र आहे. हे एक

संकल्पशक्तीचं उदाहरण आहे. योगशास्त्राकार संकल्प शक्ती मान्य करणारे आहेत. आणि अशा योगीपुरुषाची संकल्पशक्ती फार मोठी असते. सर्व सिद्धी ज्या वर्णन केलेल्या आहेत त्या संकल्पशक्तीरूपच आहेत.मानसिक शक्तीचा विकास म्हणजेच सिद्धी आहेत सगळ्या. तर त्या संकल्पशक्तीचा प्रभाव हा त्यांना मान्य आहे. प्रयत्नांनी तशी संकल्पशक्ती साध्य करून घेता येते. पण ती संकल्पशक्ती व्यवहारामध्येही आपल्याला मान्य आहे. राष्ट्रपतींनी वटहुकूम काढल्यानंतर फाशीची शिक्षा झालेल्याला सुद्धा दया होऊ शकते. सोडून देतात. सर्वोच्च न्यायालयाने जरी निर्णय दिला असला, तरी त्या राष्ट्रपती वटहुकुमाने म्हणा, त्यांच्या दयेने, त्यांच्या संकल्पाने तो त्या दोषातून मुक्त होऊ शकतो. अशी अनेक संकल्पशक्तीची उदाहरणे व्यवहारामध्ये बघायला मिळतात. पण ह्या सगळ्या संकल्पशक्ती, सत्यसंकल्प नाहीत. सर्व शक्ती ह्या सत्य संकल्परूप होत नाहीत. जीवात्म्याची कोणाचीही शक्ती ही सत्य संकल्पशक्ती नाही. ईश्वरस्वरूप झालेले महात्मे, त्यांची संकल्पशक्ती मात्र प्रभावी आहे. ज्या जीवाचा उद्धार व्हावा असं त्या महात्म्यांच्या मनामध्ये उत्पन्न होईल. त्या जीवात्म्याचं मन स्थिर लगेच होतं. कितीतरी विकार मनामध्ये, बुद्धीमध्ये आहेत. अनेक विकार बुद्धीमध्ये असताना ती बुद्धी कोणत्याही विषयाचा संपूर्ण निर्णय करू शकत नाही. हे मान्यच करावं लागतं आपल्याला. न्यायाधिशांचं एक उदाहरण दिलं होत, स्वामी महाराजांनी सांगितलं. न्यायाधिशांनी खून करणाऱ्या माणसाला फाशीची शिक्षा दिली म्हणाले. पण ज्यांनी ८/१० खून केले असतील त्या बाकीच्या खुनाची शिक्षा न्यायाधीश देऊ शकतो का ? एका खुनाबद्दल फाशी झाली की संपलं त्याचं, प्राण गेला. प्राण गेल्यानंतर बाकीची जी पापकर्म, दोष आहेत ते तसे राहिले ना ! पूर्ण शक्ती ही माणसाच्या जीवात्म्याच्या बुद्धीमध्ये नाही आहे. म्हणून त्याला सत्यसंकल्प म्हणता येत नाही. ईश्वराची किंवा ईश्वररूप झालेले महात्मे यांची संकल्पशक्ती ही मात्र

परिपूर्ण आहे. आपल्या शिष्याचा, किंवा ज्याच्यावर अनुग्रहच करायचा आहे त्याच कल्याण व्हावं असा नुसता मनामध्ये संकल्प झाला, हा संकल्प मानसिक विशेष आहे. त्या संकल्पाने सर्व कार्य होऊ शकतं, त्याला बाकीचं काहीही लागत नाही. हा एक मोठा विशेष ईश्वराच्या संकल्पामध्ये सांगितलेला आहे. किंवा ईश्वरसंकल्प शक्तीमध्ये तो सांगितलेला आहे, अर्जुनाला विश्वरूप पाहण्याची इच्छा झाली, विश्वरूप दाखवा म्हणाले. वस्तुतः अर्जुनाची योग्यता नाही आहे. पण आरंभाला नाही कसं म्हणायचं ? काहीही साधन सामग्री नसताना ती एकदम निर्माण झालेली आहे. ही संकल्पशक्ती आहे. ही सर्वांच्या जवळ नाही आहे सामान्य शक्ती बुद्धीची पुष्कळांजवळ आहे. पण त्या शक्तीपेक्षा ही मोठी शक्ती आहे. बुद्धीची शक्ती आहे. दुःशासनाची दुर्योधनाची, किंवा हिरण्यकश्यपूची शक्ती आहे. देहात्मभाव धारण करून असलेल्या बुद्धीची शक्ती आहे. शास्त्र संस्कार ज्या बुद्धीवर झालेले आहेत, म्हणजे देहापेक्षा आत्मा वेगळा आहे, तो अजरामर आहे. तो असंग आहे. कशाचा त्याला संबंध नाही वगैरे आत्मस्वरूपाचे जे जे काही भाग दाखवलेले आहेत उपनिषदात, त्याप्रमाणे ज्याला अनुभव येतो आहे, अभ्यासाने आणि वैराग्याने, अत्यंत स्थिरबुद्धीने ध्यानाने हे अनुभव यायचे आहेत. हे अनुभव ध्यानाने येण्यासाठी बुद्धीची स्थिरता अत्यंत जरूर आहे. ती स्थिरता वीतराग महात्म्यांच्या संकल्पाने सुद्धा होऊ शकते, हे योगसूत्रकारांनी सांगितलं आहे. आणि अशा प्रकारची अनेक उदाहरणंही व्यास महर्षींनी मांडलेली आहेत. शक्तिपात करणं म्हणजे शक्ति नविन देणं असा नाहिये. यांच्या संकल्पाचा प्रभाव त्याच्या चित्ताची स्थिरता करू शकतो. हे ज्ञानी महात्म्यांचं सामर्थ्य त्यांनी दाखवलेलं आहे आणि असं सामर्थ्य उत्पन्न होणार नाही असा आक्षेप, ज्याला स्वतःच्या सामर्थ्याचीसुद्धा पूर्ण जाणीव नाही अशी व्यक्ती घेते. स्वतःची कर्म चांगली कोणची, वाईट कोणची, किती केलेली आहेत ?

काल काय केली, आज काय केली हे सुद्धा जो आणखी स्मरण करू शकत नाही त्याला एकंदर बुद्धीची शक्ति किती आहे याचा निर्णय कसा करता येईल ! त्यामुळे ईश्वराची महात्म्यांची संकल्पशक्ति ही असं कार्य करू शकते हे समजू शकत नाही. पण हे शब्दप्रमाणाने सिद्ध आहे. आणखी त्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभवही आलेले आहेत. पुराणदिकांमध्ये व्यासादिकांनी वर्णन केलेले आहेत. भीष्माचार्यांची संकल्पशक्ति होती की नाही ? इच्छामरणी झाले ते. आपल्या पित्याची सेवा केली. पित्याकरता त्याग केलेला आहे. आजन्म ब्रह्मचारी राहायचं आणि राज्य करायच. राज्यत्याग नुसता नाही. ब्रह्मचारी म्हणजे संसार त्यागही त्यांनी केला. आणि त्याप्रमाणे शेवटपर्यंत राहिले. परशुराम गुरू. ते त्यांच्या विरूद्ध उभे राहिले. "तुला या स्त्रीचा स्वीकार करायला पाहिजे तुझ्यामुळे या स्त्रीच नुकसान झालेले आहे." नाही म्हणाले. "मी ब्रह्मचारी आहे, मला स्वीकार करता येत नाही" त्यांच्याबरोबर युद्ध केलं. २१ वेळा निःक्षत्रिय पृथ्वी करणारे परशुराम शेवटी तिथ थांबले. भीष्माचार्यांना जो त्यांच्या पित्याचा आशीर्वाद मिळाला. पित्याने अंतःकरणापासून दिलेला आशीर्वाद की, "तुला मरणाची इच्छा जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत यमधर्म तुला स्पर्श करू शकणार नाही." भीष्म इच्छामरणी झाले. रामराज्याचं आणखी महत्व वर्णन करताना शुकाचार्य महाराजांनी परिक्षीत राजाला सांगितलेलं आहे की रामराज्य करीत असताना ज्याला 'मृत्युश्च अनिच्छतान्नासि रामे राज्यं प्रशासति!' हे आहे का कुठे. कोणाच्या राज्यशासनात आहे? केवळ लोकशाही आपण म्हणतो, संकल्प करतो. संकल्पाने फाशीतूनही सुटका होते. इथपर्यंत संकल्पशक्ती मोठी असलेली दिसते आपल्याला. परंतु रामराज्य करीत असताना सगळेच इच्छामरणी होते असं सांगतात - शुकाचार्य. मरणाची ज्याला इच्छा नाही त्याला मृत्यू येणार नाही. मरणाची इच्छा कुणाला होते का, कधी होते की नाही. असे पुष्कळ प्रश्न निर्माण

होतील. अतिशय दुःखाच्या वेळेला होते. नको आता पुरे. भीष्माचार्य शेवटी इच्छमरणी जरी होते, तरी शरीर सोडायचं त्यांनी ठरवलं. आणि शरीर विसर्जन केलेलं आहे. भगवंताचं ध्यान करतायत. भगवान प्रत्यक्ष समोर उभे आहेत आणि अशा स्थितीमध्ये स्तुती करता करता त्यांचा देहत्याग झालेला आहे. तर अशा रीतीने मृत्यूवरती सुद्धा विजय मिळवणं इतकी मोठी संकल्पशक्ती अनेक जीवांची सुद्धा आपल्याला उदाहरणावरून दिसून येते. तेव्हा आपल्या बुद्धीची शक्ती वाढवता येणं शक्य आहे. योगशास्त्र म्हणून जे सांगितलेलं आहे त्यांनी हे वर्णन केलेलं आहे. त्यांच्यामध्ये ईश्वरतत्व त्यांनी मुद्दाम मानलेलं आहे. केवळ आत्मविचार होऊ शकणार नाही. ईश्वराची शक्ती मान्य केली पाहिजे. उपासना केली पाहिजे. त्या उपासनेच्या प्रभावाने आणखी मानवाच्या मानसिक शक्तीचा विकास सिद्धीरूपाने करायची इच्छा असेल तर तसा होईल. परंतु सिद्धी आणखी होऊ नयेत, असंही भगवंतांनी सांगितलेलं आहे. नको. माझ्याजवळ ज्यांना यायचंय ना त्यांनी सिद्धीच्या पाठीमागे लागू नये. सामर्थ्य मिळू शकेल वाटेल तशा प्रकारचं, तर ईश्वराची उपासना ही त्या करता सांगितलेली नाही, तर त्यांनी बुद्धिस्थैर्य व्हावं म्हणजे, बुद्धिस्थैर्य झाल्यानंतर सगळ्या संकल्पशक्तीचाही विकास होतो, इतरांसाठीही उपयोग त्या संकल्पशक्तीचा करता येतो. त्यांचही कल्याण करता येतं. तर या दृष्टीने ईश्वर उपासनाही महत्वाची. योगशास्त्रकार प्रयत्नवादी आहेत. प्रयत्नांनी सगळं साध्य करता येतं असं त्यांचं म्हणणं आहे. केवळ प्रारब्धावर ते अवलंबून राहिलेले नाही आहेत. संतमहात्म्यांनी जरी प्रारब्धाचा विचार मांडलेला असला तरी ईश्वराची शक्ती मोठी आहे. एवढच त्यांना सांगायला, 'ठेविले अनंते तैसेचि रहावे।' तुकाराम महाराज सांगतात म्हणजे प्रारब्धवाद मानतायत. लोकांचा आणखी बुद्धिभेद करतायत असा आक्षेप घेण्याचं काही कारण नाही. त्या अनंताची शक्ती इतकी मोठी आहे की त्याला अनुसरावं

लागतं. अपरिहार्य आहे. हा त्याचा अभिप्राय आहे. कारण निरहंकार ते झालेले आहेत. अहंकार ज्या बुद्धीतून पूर्ण निघून गेलेला आहे, अशी जी काही 'निर्ममो निरहंकारः सशान्तिमधिगच्छति।' त्याशिवाय पूर्ण शक्ति, पूर्ण ज्ञान प्राप्त होणं शक्य नाही. तुकाराम महाराजांची सर्व गाथा अभंगाची बुडवून टाकली नदीमध्ये. इंद्रायणी नदीमध्ये. आणि तुकाराम महाराज तिथं अन्नपाणी टाकून बसले. पुढे १०-१२ दिवसांनी जशाच्या तशा त्या वह्या मिळाल्या. हे आपण ऐकतो. म्हणजे तुकाराम महाराज, आपले अभंग गेले, आपले अभंग गेले, ते मिळावे म्हणत बसले होते का? अभंग आपण केले आहेत अशी त्यांची भावना होती का? ते गेले, व्यर्थ गेले, फुकट गेले, मिळाले पाहिजे अस त्यांनी म्हटले नाहीये. "आपुलीया बळे नाही मी बोलत। सखा कृपावंत वाचा ज्याची।" ही ज्यांची बुद्धी आहे, निरहंकार बुद्धी आहे. कर्तृत्व आपल नाहीये. 'मत्तः सर्वं प्रवर्तते।' हा सिद्धान्त महात्म्यांच्या मनामध्ये नेहमी असतो. म्हणून त्यांचा अहंकार पूर्ण विलयाला गेलेला असतो. आणि अशी अहंकाररहित असणारी बुद्धी ज्यांची आहे ते सर्वसंकल्प संन्यासी असतात. कधीही संकल्प कशाबद्दलही करायचा नाही. देह जरी जायचा प्रसंग आला तरी हे करायच, नाही पण अशा वेळेला अशा महात्म्यांच्या मनामध्ये जर त्या शिष्याबद्दल संकल्प निर्माण झाला तर ते शिष्याचं भाग्य आहे. महात्म्यांना काय स्वतःच्या कीर्तीची, मानापमानाची "तुल्य निंदा स्तुतिः।" हे जे काही वर्णन केलेलं आहे, त्यांना स्वतःच्या मानापमानाची काही अपेक्षा नाही. पण त्यांचच प्रारब्ध आहे. त्यांचच सत्कर्म उदयाला आलेलं आहे. त्यामुळे त्यांची सेवाबुद्धि, शुध्दबुद्धि पाहून त्यांच्या मनामध्ये संकल्प उत्पन्न झाला. तो सत्यसंकल्प आहे "ऋतंभरा प्रज्ञेचे माहात्मे म्हणतील त्याप्रमाणे त्या शिष्याचे बुद्धीतील कामक्रोधादिक विकार सगळे नाहीसे होतात आणि बुद्धी स्थिर होते. ध्यानाचा अभ्यास सुरु होतो. स्वरूपानुसंधान करू


लागतो. संसारापासून ती बुद्धी निवृत्त झालेली आहे. वैराग्यही उत्पन्न होते आणि त्या बुद्धीने ध्यानाभ्यास सुरु झालेला असताना ध्यानापेक्षा आणखी पुढची समाधी अवस्था त्याला प्राप्त होते. आणि ती समाधी अवस्था त्याचं पर्यवसान म्हणजे प्रत्यक्ष साक्षात्कार, नंतर होतो. तर अशा दृष्टीने कर्म सांगितलं आहे शास्त्रज्ञ महात्म्यांनी. ईश्वरी शक्तीचा जर संकल्प झाला तर आपला उद्धार होईल हे त्यांनी महत्वाचं सांगितलेलं आहे. आणि त्यामध्ये फायदा काय हेही दाखवलेलं आहे. आत्मस्वरूपाचं ध्यान करायचय. आत्मरूप जो संसार आहे त्यातून बुद्धी बाजूला होऊन आत्मस्वरूपापर्यंत नेऊन त्या आत्मस्वरूपाचं चिंतन करायचं हे मुख्य कर्तव्य आहे जीवात्म्याचं. मानव जन्मामध्ये हे आलं पाहिजे. तर हे साध्य. इथपर्यंत तू आलेला आहेस. अहं कोण आहे, त्याचा विचार करता करता अन्नमय, प्राणमय, विज्ञानमय, मनोमय, आनंदमय, कोषाच्याही पलीकडं एक स्वतंत्र 'अहं' साक्षी मी आहे. संसारामध्ये असणारा अहं पुष्कळ आहे. कोणाला अहं म्हणायचं! देहाला अहं म्हणायचं? इंद्रियाला अहं म्हणायचं? मी पाहातो, मी पाहिलं, मी ऐकलं म्हणतो म्हणजे श्रोत्रेंद्रिय आणखी एक झाली आहेत. त्या त्या इंद्रियांशी तादात्म्य झाल्याशिवाय अशी भाषा येणार नाही. व्यवहारामध्ये असलेला 'अहं' हा या इंद्रियामध्ये, देहामध्ये, मनामध्ये, बुद्धीमध्ये एकरूप होऊन गेलेला आहे. त्याला बाजूला करायचं ! विवेक अनेक प्रकारचे आहेत. नित्यनित्य विवेक आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक आहेत. शरीरादिकांपेक्षा मी वेगळा आहे हा विवेक झाला पाहिजे. हेयोपादेय विवेक आहे. काय घ्यायचं जगातलं आणि काय सोडायचं हे समजलं पाहिजे. हाही विवेक आहे. "त्यासाठी मी २४ गुरू केले" म्हणून भगवान दत्तात्रेयांनी आणखी त्या यदुराजाला उपदेश केला. कोणता गुण आहे. कोणता दोष आहे. काय घ्यावं कोणचं सोडावं, हे समजण्याकरता मी गुरू केले. तर अशा दृष्टीने शरीरादिकांपेक्षा

मी वेगळा आहे. इथपर्यंत बुद्धी येऊन पोचली. अनेक जन्मांच्या अभ्यासाने ईश्वरकृपेने तिथपर्यंत बुद्धी आली आणि त्याप्रमाणे आत्मस्वरूप म्हणजे, ''मी असंग आहे, सच्चिदानंदरूप आहे, साक्षी आहे. मी निर्विकार आहे. जगाचा संबंध माझ्याशी काही नाही,'' हे समजणं, समजल्यानंतर स्थिर झालं पाहिजे. म्हणजे विघ्न उत्पन्न झालं तर काय करायचं? व्याधी आहे शरीरामध्ये. आणखी काही रोग वगैरे निर्माण झाले त्यामुळे ध्यान बंद झालं. मनामध्ये आणखी काही दोष निर्माण झाले. काय याचा उपयोग आहे? काहीतरी वाटून आणखी अकर्मण्यता निर्माण झाली तरी सुद्धा तो अभ्यास बंद होणार. ध्यानाभ्यास झाल्याशिवाय समाधीप्राप्ती नाही होणार. ध्यानापेक्षा आणखी जास्ती स्थिर मन होणं, म्हणजे समाधी आहे. प्रत्याहारानंतर ध्यानाला सुरवात आहे. प्रत्याहार झाल्यानंतर सगळ्या इंद्रियांपासून मन बाजूला राहू शकतं. म्हणजे ज्या स्वरूपाचं आपण ध्यान करायला लागू त्या ध्यानाने त्या ध्येयाचा साक्षात्कार होतो. हा एक सिद्धान्त आहे. सगुण स्वरूप असो अथवा निर्गुणात्मक स्वरूप असो. सगुण स्वरूपाचं ध्यान हे सुद्धा ध्येयाचा साक्षात्कार करून देणारं आहे. शंकराचार्य महाराजांचे जे मुख्य शिष्य, पद्मपदाचार्य हे नरसिंहाचे उपासक होते म्हणतात. पण ती नरसिंहाची उपासना किती मोठी होती त्यांची! प्रत्यक्ष नरसिंहरूप ते होते. ध्यान करता करता नरसिंहरूप ते होऊन गेले. बीडच्या जवळ नामगाव म्हणून एक गाव आहे. आशापूर्त गणेश म्हणून त्याला म्हणतात. तिथं शुंडी ऋषी राहात होते. शुंडी ऋषी त्या वाल्मीकी ऋषींच्या उदाहरणाप्रमाणे, नामा कोळी म्हणून कोणीतरी वाटमाऱ्याचा धंदा करणारे पूर्वी होते. जंगल होतं तिथं. गणेशांचे शिष्य मुद्गल ऋषी तिकडून निघालेले, त्यांना त्यांनी धरलं, 'काय आहे तुमच्याजवळ? टाका. तुम्हाला मी मारणार आहे.' त्यांची कृपा झाली, संकल्प झाला. त्यांना उपदेश करून मुद्गल ऋषी निघून गेले. आणि तो नामा कोळी

ध्यान करता करता म्हणजे नामस्मरण करता करता त्यांना सोंड निर्माण झाली. सरूपता मुक्ती ज्याला म्हणतात. गणपतीप्रमाणे शुंडी ऋषी त्याला म्हणतात. त्यांच ते स्थान आहे. आशापूर्त गणेश. तर सगुणाच्या ध्यानाने सुद्धा मनुष्य अशा प्रकारचा होऊ शकतो. मग निर्मळ स्वरूप, आत्मस्वरूप मी निर्विकार आहे. असंग आहे. हे ध्यान करता करता आणखी त्या ध्यानानेच स्थिरता मनामध्ये निर्माण झाल्यानंतर समाधी अवस्था प्राप्त होते. ज्या समाधी अवस्थेमध्ये देहाचा काही संबंध नाही. काही नाही. आत्माकार बुद्धी झालेली आहे. देहसंबंध नाही. काही नाही. आणि अशा स्थितीमध्ये, त्या समाधीचं पुढचं पर्यवसान म्हणजे साक्षात्कार हे आहे. तर त्या समाधी अवस्थेपर्यंत जायला जर मध्ये विघ्नं उत्पन्न झाली तर काय करायचे? कर्म आपण केलेली असतात. अद्यापि त्या भूमिकेवर आपण गेलेलो नाही. ध्यानापर्यंत आलो. कसंतरी आलो म्हणा. तिथे पण ते टिकलं पाहिजे. शरीरामध्ये काही रोग उत्पन्न झाले. मानसिक विकृती निर्माण झाल्या, सगळी कामं बंद झाली, हे नको. याची काही जरूर नाही असं वाटायला लागलं, कंटाळा आला तर हे जे सगळे दोष आहेत तर योगसूत्रकार मुद्दाम सांगतात. सर्वांतर्यामी जो आहे आत्मा, परमात्मा, त्याचा साक्षात्कार म्हणजे त्याचं ज्ञान होतं. त्या ध्यानाने, ध्यान करता करता आणखी, 'तोच मी चेतन आहे. निर्विकार मी आहे. असंग मी आहे.' हे पूर्ण आपल्याला कळल्यानंतर सुख-दुःखाचा संबंध संपलाय. विवेक वैराग्याची सीमा झालेली आहे. सर्वांपासून त्याचं मन बाजूला झालेलं आहे. आत्मस्वरूपाचं ज्ञान झालं

पण मध्ये येणारी विघ्नं, त्याला काय करणार? विघ्नंसुद्धा त्या परमेश्वराच्या प्रणिधानाने ध्यानाने दूर होतात. 'योगक्षेमं वहाम्यहम्' म्हणतात ना! जे त्याला प्राप्त झालेलं नाही, ते त्याला प्राप्त करून देणं आणि जे मिळालं आहे त्याचं संरक्षण करणं, ह्या दोन्ही जबाबदाऱ्या ईश्वराने मान्य

केलेल्या आहेत. पण असा जो अनन्यभूत ध्यान करणारा आहे त्या भक्ताचा योगक्षेम मी करतो. व्यावहारिक योगक्षेम नुसता नाही. व्यवहारामध्ये काय मिळायचे ते मिळेल. राहील. परंतु पारमार्थिक योगक्षेम महत्वाचा आहे. बुद्धीची स्थिरता मिळाली पाहिजे. आणि ती स्थिरता मिळून ध्यानाला सुरवात झाल्यानंतर ही आलेली विघ्नं दूर झाल्याशिवाय काय करणार! अखंड ध्यान चालू पाहिजे. त्या अखंड ध्यानाचं पर्यवसान समाधी आणि साक्षात्कारामध्ये आहे. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यानंतर अभ्यास आहे. वासनाक्षय सगळा झाला पाहिजे. मनाचा मनोनाश, तत्वज्ञान दृढ झालं पाहिजे. त्याकरिता अखंड अभ्यास आहे. तो अखंड अभ्यास शेवटपर्यंत चालू राहाण्याकरता ईश्वराची, सद्‌गुरूंची उपासनाही अत्यंत आवश्यक मानलेली आहे. पूर्ण शक्तीसंपन्न ईश्वर आणि सद्‌गुरू ही ईश्वररूप आहेत, म्हणून त्यांच्या शक्तीने आपली विघ्नंही दूर होतात. प्राप्त झालेलं साधन जे काही आपल्याजवळ आहे, त्या साधनांची दृढता होते, स्थिर होतं ते साधन. फलसिद्धी होते. आणखी या दृष्टीने हा एक मार्ग योगशास्त्रकारांनी दाखवलेला आहे. आणि वीतराग महात्म्यांचं चिंतन केल्याने, संतांची चरित्रं वाचन केल्याने मनाची स्थिरता होती असं योगसूत्रकार सांगतात. त्या संतमहात्म्यांचा जर संकल्प झाला तर त्या संकल्पाने सगळं कार्य होऊन जात आहे. ज्ञानेश्वर महाराज गेले असं मानायची जरूर नाही. समाधी लावून बसले म्हणजे संपलं. ‘काही नाही, आळंदीला कोणी नाही,’ असं काहीजण म्हणतात. पण अजून आळंदीला लोक जातात. अनुष्ठानं करतात. त्यांना दृष्टान्त होतायत. मध्ये काही निघालं होतं. ‘जमिनीमध्ये त्यांची समाधी आहे. ते तिथे बसलेले आहेत. ती पाहूया आपण.’ विज्ञानवाद आहे सध्या. त्यांनी काही साधन काढलेलं आहे म्हणे. आतलं सुद्धा दिसतं म्हणे, भिंतीच्या पलिकडचं सुद्धा दिसतं. पण पुष्कळ विचार झाला, सगळ्यांचा बुद्धीभेद होईल म्हणाले. तुमच्या



पू. सौ. आईसाहेब कवीश्वर

विज्ञानवादाप्रमाणे जर त्या साधनाने काही निघालं नाही, ज्ञानेश्वरांचं रूप दिसलं नाही तर किती लोकांचा बुद्धीभेद होईल! त्यामुळे ते राहिलं, शेवटी सोडून दिलं त्यांनी. म्हणजे वैज्ञानिक साधन हे श्रेष्ठ आहे आणि त्याच्यापेक्षा ज्ञानेशांचा संकल्प श्रेष्ठ मानायला आम्ही तयार नाही. त्या साधनाने पाहिलं म्हणजे ज्ञानेश्वर आहेत का नाहीत हे सिद्ध होतं, ही आमची बुद्धी आहे.

गुलाबराव महाराज जे विदर्भामध्ये होऊन गेले. त्यांची गोष्ट नागपूरच्या एकाने सांगितली. महाराज अंध होते. चौथ्या पाचव्या वर्षी त्यांची दृष्टी गेली. ते आपली पूजा बिजा करायचे, बसायचे, ध्यान करायचे. नामस्मरण करायचे. एक फोटोग्राफर नेहमी येणारा तो म्हणाला, "महाराज तुमचा फोटा काढायचाय." महाराज म्हणाले, "फोटो वगैरे काही काढायचा नाही." त्यांनी ताकीद केली काही काढायचा नाही. त्याने ऐकून घेतले. संध्याकाळी काही चार मंडळीं बरोबर ते आपले बाहेर फिरायला निघाले. त्यांनी सगळयांचे फोटो घेतले. हे नाही म्हणाले होते तरी फोटोग्राफरने आपल्याला तर इच्छा आहे, म्हणून फोटो घेतलेले आहेत. आणखी दुसऱ्या दिवशी सकाळी तो महाराजांच्याकडे आला. आल्याबरोबर त्यांनी विचारले, "का बाबा फोटो निघाला का?" घाबरला तो. "तुमचा काही फोटो त्यात आला नाही. बाकीच्या तिघांचा त्यात आला म्हणाले." म्हणजे महात्म्याच्या संकल्पाला आम्ही कमी मानणार!

ज्ञानेश्वर महाराज स्थिर समाधी लावून बसले आहेत. हे आम्हाला खरं वाटत नाही. पण ते खरं समजण्यासाठी ज्या वैज्ञानिक साधनाचा उपयोग केला आणि त्याच्यामध्ये जर ते खोट ठरलं तर किती लोकांचा बुद्धीभेद होईल! किती वारकरी ७०० वर्षांपासून जाणारे, त्यांचा बुद्धीभेद करण्याकरता वैज्ञानिक साधनांचा उपयोग केला असं होणार नाही का? मग ते थांबल नंतर. तो विचार सांगतात लोक. तर अशा दृष्टीने आणखी

ईश्वराचा संकल्प जो आहे. महात्म्यांचा संकल्प हा आणखी श्रेष्ठ मानलेला आहे शास्त्रकारांनी. त्या संकल्पाप्रमाणे आणखी कार्य चालू आहे. महात्मे आजही आहेत. ईश्वराच्या कृपेने आणखी धर्मस्थापनेचे नर समर्थांनी सांगितल्याप्रमाणे आजही आहेत. पुढही होणार आहेत. होऊन गेलेले आहेत. ईश्वराच्या आदेशाप्रमाणे आणखी धर्मस्थापना ते करत असतात. प्रसंगी आपल्या संकल्पशक्तीचा उपयोगही त्यांना करावा लागतो. आणि नैसर्गिक शक्ती ही त्यांची संकल्पशक्ती असली तर त्यांनी अहंकार निर्माण होत नाही. हे एक मोठं वैशिष्ट्य आहे. शक्ती जवळ असून शक्ती विसरून जाणारे महात्मे ते आहेत. चांगदेव आले. वाघावर बसून आले. आकाश मार्गाने आले. गुरू म्हणून त्यांना शरण यायला निघालेले असताना सुद्धा अहंकार घेऊन आले. योगाभ्यास पुष्कळ झालेला आहे. आणि आपले ते बाहेर बसले. थंडीचे दिवस होते. ही कथा आपण ऐकतो. तर सगळेच आहेत दोघे-तिघे बंधू, मुक्ताई. अहो हे योगी आलेले आहेत. त्यांना सामोर जायला पाहिजे. ती भिंत चालवायला लागली. अस आपण समजतो. ऐकतो पुष्कळ कथा ही. भिंत ज्या वेळेला चालायला लागली हे चांगदेवांनी पाहिलं. त्यावेळेला त्यांचा अहंकार पूर्ण गेला. वाघाला वश करणं. वाघावर आज्ञा चालवणं. त्याला घेऊन जांणं. वाघ चेतन आहे. मीही चेतन आहे. तो ऐकणं शक्य आहे म्हणाले. पण दगडामातीची भिंत चालवणारे हे, यांची केवढी मोठी शक्ती आहे! पण हा एवढाच विचार केला चांगदेवांनी. यापेक्षाही पुढचा विचार आहे की दगडामातीची भिंत आपण चालवतो या शक्तीची आठवणसुद्धा त्यांना राहिलेली नाही. केवढी शक्ती आहे! निरहंकार बुद्धी ज्ञानेश्वर महाराजांची. चांगदेवांच्या पत्राचं उत्तर लिहायला सांगितल निवृत्तीनाथांनी! चांगदेवांच्या पत्रात तर मजकूर नाही. कोरा कागद आहे. कारण कोरा कागद म्हणजे लिहायला बसल्यावर त्यांच्या बुद्धीमध्ये संशय निर्माण झाला ना! नमस्कार ज्ञानेश्वर महाराजांना लिहायचा का आशीर्वाद लिहायचा! पहिल्या वाक्यामध्येच थांबले ते!

आशीर्वाद कसा लिहायचा म्हणाले! गुरू म्हणून आपल्याला जायचंय त्यांच्याकडे, आशीर्वाद लिहितात ? नमस्कार लिहायचा ! नमस्कार म्हणजे केवढा मोठा १४०० वर्षांचा मी आहे हे २०-२१ वर्षांचे आहेत. लहानांना नमस्कार कसा लिहायचा ? संशय उत्पन्न झाल्यानंतर कोणतंही व्यवहारातलही कार्य संपतं, काही म्हणून राहात नाही. निवृत्तीनाथांनी पाहिल. काही नाही कोरा कागद आहे. मुक्ताबाई तर स्पष्ट बोलून गेल्या १४०० वर्षे राहूनही अजून कोराच आहे म्हणाल्या. ज्ञानेश्वर महाराजांना उत्तर लिहायला सांगितलं, तिथं काही वेळ नाही.

**"स्वस्तिश्री वटेषु । जो लपोनी जगदाभासु ।**
**दावी मज ग्रासु । प्रगटीला ॥**

वटेश्वर चांगदेवाचं कल्याण असो. लहान मला समजत असला तरी लहानांनी सुद्धा मोठ्यांचं 'कल्याण असो' म्हणायला हरकत नाही. मोठा समजत असला तरी मोठ्यांनी लहानांचं कल्याण लिहायला हरकत नाही, हे एवढं चांगदेवाला सुचलं नाही. एवढे योगी, एवढे समाधी लावणारे आपल्या संकल्पशक्तीनं मृत्यू आलेल्याला जिवंत करणारे. १४ वेळा ज्यांनी स्वतःचा मृत्यू चुकवला, दुसऱ्यालाही जिवंत केलं, त्यांना एवढं लक्षात आलं नाही. आणखी स्वतःला मोठं समजून आलेले आहेत. ज्ञानेश्वर महाराजांची बुद्धी इतकी पूर्ण शक्तिसंपन्न आहे, की चांगदेवांना ते चांगदेव म्हणून समजत नाही आहेत. मी मोठा आणि ज्ञानेश्वर लहान हे समजणं ही जी बुद्धी आहे ती देहापर्यंत आलेली बुद्धी आहे. देहाच्या पलिकडे अजून गेलीच नाही. मोठा आणि लहान देहाच्या दृष्टीनं म्हणतात. ज्या देहाला काळाचा संबंध अधिक आहे तो देह मोठा आहे. ज्या देहाला काळाचा संबंध कमी आहे, तो देह लहान आहे.

पण चांगदेवांनी स्वतःला मोठं समजून ज्ञानेश्वरांना लहान समजणं हे अद्यापि क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेकही झाला नसल्याचं लक्षण आहे. ध्यान

समाधी फार पुढं आहे. त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांनी लिहायला सुरवात करताना चांगवटेश्वर म्हटलं. चांगदेव म्हणजे आत्मस्वरूपानेच ते समजतात. ''स्वस्तिश्री' वटेषु जो लपोनि जगदाभासु दावी'' आत्मस्वरूप आच्छादित झाल्यानंतर आणखी जगदाभास दिसतो आहे. आणि आत्मस्वरूप प्रगट झाल्यानंतर जगदाभास बंद होतो आहे. चांगदेवाला ते आत्मरूपाने पहातात. केवढी बुद्धी आहे. शास्त्र संस्कृत बुद्धी ! पूर्ण ज्ञान आणखी या बुद्धीमध्ये आलेलं आहे. त्यामुळे आणखीही शक्ती निर्माण झालेली आहे. संदेह नाही, काही नाही. ६५ ओव्या लिहून पाठवून दिल्या. काम झालेलं आहे. तर अशा दृष्टीने ही आपली बुद्धी शास्त्रसंस्कार संपन्न व्हायला पाहिजे. शास्त्र हे सुद्धा ईश्वराच्या बुद्धीतूनच निर्माण झालेलं आहे. ईश्वराची आज्ञा आहे. त्या शास्त्राने जे जे सांगितलेले आहे, ती सगळी साधनं योग्य आहेत. आपल्याला जी होण्यासारखी असतील ती घ्यायची, त्या साधनांचा अभ्यास करायचा. वैराग्यसंपन्न होण्याचा प्रयत्न करायचा. त्याच्यामध्ये काही विघ्न येऊ नये म्हणून ईश्वराची प्रार्थना करायची. श्रेष्ठ जे महात्मे आहेत त्यांची संगती मिळाली तर करायची. नाहीतर त्यांचे जे ग्रंथ आहेत, ती सुद्धा संगतीच आहे. ग्रंथवाचन करणं, मनन करणं. चिंतन करणं ही सुद्धा त्यांची संगतीच आहे. या दृष्टीने आपल्या मनाची बुद्धीची स्थिरता जितकी जितकी आधिक वाढवता येईल, तितकी वाढवण्याकरता मनुष्यजन्म आहे. या मनुष्यजन्मामध्ये बुद्धीमध्ये सांसारिक वासनांचा संग्रह जितका अधिकाधिक होत जाईल. तितकं तितकं आपण परमेश्वरापासून दूर दूर जात आहोत. त्या करता महापुरुषांचा संश्रय, महापुरुषांची संगती, वैचारिक असो किंवा प्रत्यक्ष प्रारब्धाने मिळाली तर तशी करून आपल्या मनाची स्थिरता करून घेऊन अभ्यास करायचा आहे. आत्मस्वरूपाचं चिंतन करण हे मुख्य आहे. स्वरूपानुसंधान चालू रहावं याकरता ईश्वराची उपासना करणं हे आणि सर्वही महात्म्यांचं सांगणं

आहे. भगवंतांनी शास्त्ररूपाने ते आपल्यापुढे मांडलेलं आहे. भारतासारखा आणखी श्रेष्ठ देश कुठही दिसत नाहीये. इतरत्र केवळ अर्थ काम याशिवाय कोणताही विचार मनामध्ये येत नाही. पण मोक्षस्वरूप काय समजल्यावर चांगलं आहे असं वाटतं. प्रयत्न मात्र आपण करत नाही. सर्व दुःखनिवृत्ती, सर्वही दुःख संपणं म्हणजे मोक्षपदार्थ आहे. चांगल आहे की हे ! कोणचीही दुःखं, अध्यात्मिक, अधिभौतिक, अधिदैविक नाहीत, भूकंप नाही, संप नाही, काही नाही. चांगलं आहे. सर्वही दुःखाची निवृत्ती म्हणजे मोक्षपदार्थ आहे. हे नको का कुणाला? पण त्याच्याकरता जे काही धर्मानुष्ठान आहे. ईश्वराची आज्ञा पालन केली पाहिजे. कर्मयोग आहे. उपासना योग आहे. भक्तीयोग आहे. योगाभ्यास करण्याची शक्ती असेल तर तो योगमार्गही आहे. अवघड आहे. सांगणारेही भेटणं कठीण आहे. ज्ञानमार्ग तर फारच अवघड आहे. तेव्हा या दृष्टीने जी जी साधनं आपल्याला करता येतील ती करावी. अर्जुनाला फक्त कर्मयोगाचं अनुष्टान करायला सांगितले. तुला जे प्राप्तकर्म आहे ते तू करत राहा. पुढचा विचार तुला करायचं कारण नाही. फल मिळेल की नाही वगैरे संशयही बाळगण्याचं कारण नाही. मिळणार नाही अशा प्रकारचं विरुद्ध मत करून घेण्याचंही कारण नाही. ज्यांनी सांगितले. तो फल देणारा समर्थ आहे. आणि मी करणारा आहे अशी बुद्धी ठेऊ नकोस. "अहं कर्ता। अशी बुद्धी ठेऊन अमुक फळ मला मिळालं पाहिजे फलाची अभिलाषा बाळगून कर्म करू नकोस," एवढं त्याला सागितलं. ईश्वराचं स्मरण करून तू हे सगळं करत जा. एवढा त्याला कर्मयोग सांगितला आहे. त्याच्यापेक्षा कितीतरी पाठीमागे आपण आहोत. किती जन्माच्या नंतर अर्जुनाची बरोबरी प्राप्त होईल. कुणाला ठाऊक. पण ईश्वराची प्रार्थना तेवढीच करायची. तत्त्वज्ञान होण्याची पात्रता आपण प्राप्त करून घ्यायची म्हणजे बुद्धी स्थिर झाली पाहिजे. निर्वासन झाली पाहिजे. म्हणजे आपल्या स्वरूपाचं चिंतन आम्ही करू

शकू. आणि त्या चिंतनाने पुन्हा साक्षात्कार प्राप्त होतो. एवढचं मागायचं आहे.

भगवंतांनी ज्ञानप्राप्तीची साधनं सांगितली आहेत. प्रणिपात पाहिजे. म्हणजे नम्रता पाहिजे. चिकित्सा करताना अहंकाराने विचारायला जाऊ नये. तत्वबोध व्हावा. चांगलं योग्य कळावं. प्रणिपात पाहिजे. त्यानंतर परिप्रश्न, म्हणजे चिकित्साच आहे. चिकित्सा नको असं नाही. भगवान सांगतात. चिकित्सा पाहिजे ? करा. चांगली योग्य दृष्टीने चिकित्सा करा. "राम रावणाचं युद्ध झालंच नाही, कौरव पांडवांच युद्ध झालंच नाही. कालिदास झालाच नाही," हे गृहित धरून सुरुवात करू नका. मग काय निर्णय होईल कुणास ठाऊक! त्या बुद्धीवर असे संस्कार चांगले घेऊन त्याप्रमाणे त्या बुद्धीनं विचार करा. ही सेवा, हे साधन सांगितलेलं आहे. परंतु ही सुद्धा मुख्य साधन नाहीत. ज्ञानाची मुख्य साधनं, ही मानली आहेत, 'श्रद्धावान् लभते ज्ञानम् ।' अंतरंग साधन पुढे सांगतात भगवान. श्रद्धा पाहिजे मनामध्ये हे सगळं खरं आहे. परमेश्वराची आज्ञा आहे. वेद काय, शास्त्र काय, पुराणं काय, इतिहास काय महात्म्यांचं सांगणं काय सगळे शब्दाप्रमाणे आपण जरी मानत असलो, शब्द जरी असले तरी, 'हे सगळं खरं आहे. ही श्रद्धा विश्वास हे मुख्य अंतरंग साधन आहे. आणखी त्या ध्येयाची सिद्धी करून घेण्याकरता आणखी प्रयत्न करणं, इंद्रिय निग्रह करणं ही सगळी साधनं आपल्याला प्राप्त झाली पाहिजेत. आपल्याजवळ साधनं किती कमी आहेत. किती दोष आहेत आपल्याजवळ! गुणदोष निरीक्षण करून त्या करता आणखी साधनाभ्यास, ईश्वरप्रार्थनाही करत असावी. ही सगळी साधनं भारतामध्ये पूर्वीपासून सिद्ध आहेत. काही नवीन असं उसनं घ्यायची काही जरूर नाही. आणि निराश होण्याचं कारणच नाही. आत्मस्वरूप हे अजरामर आहे. जरी त्यांनी वैराग्य करायला सांगितलं असलं, सर्वसंग परित्याग करायला सांगितला असला तरीसुद्धा

"जीवात्मा अजरामर आहे," हा मुद्दाम सिद्धान्त सांगितला आहे. जीवाला जन्म नाही, नाश नाही. पण त्याच्या बुद्धीमध्ये जर दोष निर्माण झाले, तर त्याला मात्र ही पाप-पुण्य त्यामुळे होतात. त्या कर्माचं फल भोगावं लागतं. त्यातून सुटून जाण्याकरता उपायही सांगितले. सगळं सांगून ठेवलं आहे. महात्मे लोक निर्माण झालेले आहेत. ईश्वराच्या आज्ञेने कार्य करतायत. आपल्या शक्तीप्रमाणेच सांगतात. शास्त्र जसं सांगतं त्याप्रमाणे सांगितलेलं आहे. आणि हे सगळंही आपल्याला प्राप्त व्हावं. सर्वांतर्यामी 'ईश्वरः सर्वभूतानां' हा शेवटचा उपदेश आहे. सर्वांच्या हृदयस्थ परमेश्वर आहे. पूर्ण शक्तीसंपन्न आहे. त्याला तू शरण जा. अहंकार त्याग करून शरण जा. मला काहीही करण्याची शक्ती नाही ही जाणीव मनामध्ये बाळगून साधनाभ्यास सुरु आहे. प्रार्थना करा म्हणजे सगळं होतं. त्या सर्वांतर्यामी परमेश्वराने आणि तत्स्वरूप महात्म्यांनी आमच्यावर कृपा करावी आमच्या बुद्धीमध्ये असलेले जे अनेक दोष आहेत, गेले असं समजता येत नाही आपल्याला. माझा राग गेला, मला काही वासना नाही. किती दिवस, किती वेळ, पाहिलय का आम्ही. किती दिवस गेलेले आहेत? ताससुद्धा जात नाही. विरुद्ध घटना घडल्याबरोबर लगेच रागावतो आपण. हे विकार किती मनामध्ये भरलेले आहेत. हे सगळे विकार मनातले दूर होणं म्हणजे किती मनाची शांतता पाहिजे. त्या सर्वांतर्यामी परमेश्वराजवळ प्रार्थना करून आपलं हे जे काय कार्य आहे त्या कार्यामध्येही असंच चिंतन अखंड व्हावं, सर्वही साधनांचा उपदेश योग्य अधिकारी व्यक्तींकडून आपल्या कानी पडावा, त्याप्रमाणे आणखी आचरण करावं. ईश्वराची प्रार्थना आणि ती आपल्याकडून चालू रहावी, अशी हृदयस्थ परमेश्वराला प्रार्थना करून आपल्या आणखी सांगण्याप्रमाणे जे काही यथामती विचार आपल्यापुढे मांडलेले आहेत, त्यामध्ये हंसक्षीर न्यायाने जे आपल्याला ग्रहण करण्यायोग्य वाटतील ते ग्रहण करावेत.

**अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।**

